# रोजगार हमी योजना
# पुनर्विलोकन समितीचा अहवाल

## काय सांगतो?
## काय सुचवतो?

### अहवालाचा संगतवार गोषवारा
### आणि
### वंचितांच्या दृष्टिकोनातून टिप्पणी

प्रयास

संसाधने व उपजीविका गट, पुणे

ऑगस्ट २००५

# अनुक्रमणिका


**प्रस्तावना** १

**भाग १ : अहवालाची ओळख** २

अ) अहवाल कसा तयार झाला?

ब) अहवालातील शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर असे बदल होतील

**भाग २ : अहवालातील शिफारसींची सविस्तर चर्चा** ६

अ) शिफारसींबाबत अहवालात केलेली मांडणी आणि वंचितांच्या दृष्टिकोनातून त्यावर उपस्थित होणारे प्रश्न–मुद्दे

ब) अहवालात दुर्लक्षित राहिलेले मुद्दे

क) अहवालाच्या एकूण परिणामाबाबत काही निरीक्षणे

**भाग ३ : अहवालात विचारच न झालेले प्रश्न** २०

**पुनर्विलोकन समितीच्या अहवालातील शिफारसी** २१

# प्रस्तावना

रोजगार हमी योजनेच्या गेल्या २५ वर्षातील यशापयशाचा आढावा घेऊन त्यात कालानुरुप बदल सुचवण्यासाठी राज्य शासनाने २००१ मध्ये 'रोहयो पुनर्विलोकन समितीची नेमणूक केली. या समितीचा अहवाल ९ मार्च २००५ रोजी शासनाला सादर केला गेला. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात तो सादर झाला परंतु त्यावर चर्चा मात्र झाली नाही. ही चर्चा पुढील, म्हणजेच विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात होणे अपेक्षित आहे.

पुनर्विलोकन समितीच्या या अहवालातील शिफारसींद्वारे रोजगार हमी योजनेत अतिशय मूलगामी बदल सुचवलेले आहेत. या बदलांची व्याप्ती योजनेच्या उद्दिष्टापासून ते योजनेची अंमलबजावणी, नियमन आणि निधी–वापर अशा विविध अंगांना भिडणारी आहे. 'रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील असंघटित मजुरांना 'सन्मानाने जगण्याचा हक्क' देणारी राज्यातील तसेच देशातील एकमेव योजना आहे', हा संदर्भ लक्षात घेतल्यास रोजगार हमी योजनेतील कोणत्याही बदलांचे असंघटित कष्टकऱ्यांसाठी असणारे महत्त्व वेगळे विशद करण्याची गरज नाही.

रोजगार हमी वंचिताभिमुख झाल्यास तिचे खऱ्या अर्थाने पुनरूज्जीवन होईल या भूमिकेतून अनुभवी कार्यकर्ते आणि अभ्यासकांच्या सहयोगाने गेल्या एक वर्षापासून अभ्यासाधारित धोरणवकिलीचे प्रयत्न प्रयासच्या संसाधने आणि उपजीविका गटाने सुरु केलेले आहेत. पुनर्विलोकन समितीचा अहवाल तयार करण्याच्या प्रक्रियेतील अपारदर्शकता आणि अहवालातील शिफारसी प्रत्यक्षात आल्यास वंचितांवर होऊ शकणारे दीर्घकालीन परिणाम या दोन मुद्यांचा विचार करता, वंचितांच्या दृष्टिकोनातून अहवालाची व्यापक आणि विधायक चर्चा व्हावी अशी या अहवालाबाबत प्रयासची सुरुवातीपासूनची भूमिका आहे.

या पार्श्वभूमीवर 'प्रयास' आणि 'शेतमजूर, कामगार व रोजगार हमी समन्वय समिती' यांच्या पुढाकाराने १४ जुलै २००५ रोजी पुणे येथे रोहयोच्या प्रश्नावर काम करणाऱ्या (राज्यातील सुमारे १०० संघटना, संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या) ४५ कार्यकर्त्यांची बैठक झाली. त्या बैठकीत एकमताने पुढील दोन मागण्या करण्यात आल्या: (अ) अहवालातील शिफारसींच्या अंमलबजावणीवर सरकारने तातडीने स्थगिती द्यावी आणि (ब) असंघटित क्षेत्राच्या प्रश्नांवर काम करणारे राज्यभरातील कार्यकर्ते, अभ्यासक तसेच सुजाण नागरिकांचा अहवालातील युक्तिवाद व शिफारसींवरील प्रतिसाद समजून घेण्यासाठी सरकारने विचारविनिमयाची प्रक्रिया सुरू करावी. याच दोन मुद्यांवर राज्यभरातील स्वयंसेवी संस्था, संघटना आणि अभ्यासकांचे निवेदन लोकप्रतिनिधींना पाठवणे, स्थानिक पातळीवर पत्रकारपरिषदा घेणे अशा प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत.

सदर टिपण १४ जुलैला झालेल्या बैठकीआधी तयार केले होते. कार्यकर्ते व अभ्यासकांना थोड्या वेळात अहवालाचा गाभा समजून घेता यावा, त्याचप्रमाणे अहवालातील युक्तिवाद व शिफारसींची सुसंगत मांडणी व्हावी व त्यातून प्रत्येक शिफारसीमागील युक्तिवाद नेमकेपणाने व स्पष्टपणे मांडला जावा असा हा आढावा तयार करण्यामागील उद्देश होता.

सदर टिपणात अहवालाची थोडक्यात ओळख करुन देणारा आढावा आणि वंचितांच्या दृष्टिने महत्त्वाचे मुद्दे यांची एकत्रित मांडणी एकूण तीन भागांमधे केलेली आहे: १) अहवालाची ओळ्ख २) अहवालातील शिफारसींची सविस्तर चर्चा आणि ३)अहवालात विचारच न झालेले प्रश्न. याशिवाय, अहवालातील शिफारसीदेखील टिपणाच्या शेवटी संदर्भासाठी दिलेल्या आहेत.

रोहयो समाजातील वंचित घटकांना सन्मानाने जगण्यासाठीचे हक्काचे साधन व्हावी यासाठी हिवाळी अधिवेशनापर्यंत या अहवालावर समाजातील विविध घटकांच्या, विशेषत: वृत्तमाध्यमे व लोकप्रतिनिधींच्या सहभागाने सखोल विचारविनिमय होणे अतिशय गरजेचे आहे. अशा विचारविनिमयासाठी सदर टिपण उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

***************

# भाग १ : अहवालाची ओळख

'अहवाल कसा तयार झाला' व 'अहवालातील शिफारसी प्रत्यक्षात आल्यास योजनेत होणारे बदल' या दोन मुद्यांच्या आधारे अहवालाची ओळख मांडलेली आहे.

## अ) अहवाल कसा तयार झाला?

**समितीची नियुक्ती :** सन २००१ मध्ये रोजगार हमी योजनेची पुनर्रचना करुन सुधारणा करण्यासाठी शासनाने एका समितीची स्थापना केली. १६ जून २००३ ला ही समिती डॉ. जयंतराव पाटील, माजी सदस्य, योजना आयोग यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्गठित करण्यात आली. २७ मे २००४ च्या शासन निर्णयाद्वारे ह्या समितीवर त्या वेळचे मुख्य अभियंता व सहसचिव (श्री. दि. मा. मोरे) नियोजन विभाग यांची कायम आमंत्रित म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**समितीची कार्यपद्धती:** या पुनर्विलोकन समितीची पहिली बैठक मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ८ जुलै २००३ रोजी झाली. त्यानंतर समितीने औरंगाबाद, पुणे, मुंबई येथे बैठका घेतल्या व मान्यवरांची मते जाणून घेतली. दिनांक ११ व १२ मार्च २००४ रोजी यशदा, पुणे येथे समितीची दुसरी बैठक झाली. या बैठकीनंतर अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार या गावाला समितीने खास भेट दिली. वेगवेगळ्या बैठकांच्या माध्यमातून, क्षेत्रीय भेटीच्या माध्यमातून समितीने या विषयात ज्यांनी चिंतन केलेले आहे, त्यांचे मनोगत जाणून घेतले. ग्रामीण भागातील लोकांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. तसेच योजना राबविणाऱ्या प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची मते समितीने जाणून घेतली. यामध्ये सचिव (रोहयो), विभागीय आयुक्त, विभागीय कृषी आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, संचालक कृषी इत्यादींचा समावेश होता.

**समिती सदस्य:** समितीच्या शेवटच्या बैठकीमध्ये सदस्यांना त्यांच्या मनामध्ये रोहयोच्या पुनर्रचनेसंबंधी जे विचार आहेत, ते लिखित स्वरुपात देण्याबद्दल आवाहन करण्यात आले. याला प्रतिसाद देऊन समितीच्या सदस्यांनी लेखी स्वरुपात त्यांचे विचार समितीकडे सुपूर्त केले. समितीने हे लिखाण तसेच इतर सर्व विश्लेषण संकलित करुन सदर अहवाल तयार केला. अहवाल तयार करण्याआधी अशासकीय सदस्यांच्या सूचना लिखित स्वरुपात मागविण्यात आल्या, परंतु अहवालाचे प्रत्यक्ष लिखाण करताना मात्र त्यांना वगळण्यात आले, अशी माहिती समितीच्या अशासकीय सदस्यांपैकी एक सदस्य – ज्येष्ठ स्त्रीवादी अभ्यासक प्रा. छाया दातार व समितीवरील दुसरे अशासकीय सदस्य – ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. एच.एम.देसरडा यांनी दिली. समितीमधे खालील सदस्यांचा समावेश होता:

१) डॉ. जयंतराव पाटील, अध्यक्ष, माजी सदस्य, योजना आयोग

२) श्री. दि. मा. मोरे, कायम आमंत्रित, मुख्य अभियंता व सहसचिव, नियोजन विभाग

३) श्री. स. अ. जयवंत, सदस्य सचिव, उप सचिव रोहयो, नियोजन विभाग

४) श्री. अशोक पाटील डोणगांवकर, सदस्य, माजी आमदार, औरंगाबाद

५) श्री. कृष्णराव इंगवे, सदस्य, माजी अध्यक्ष, रोहयो समिती

६) प्रा. एच. एम. देसरडा, सदस्य, औरंगाबाद

७) डॉ. छाया दातार, सदस्य, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई

८) श्री. प्रशांत गणपतराव पाटील, सदस्य, इंदापूर, जि. पुणे

९) श्री. पोपटराव पवार, सदस्य, हिवरे बाजार, जि. अहमदनगर

१०) श्री. देविदास मणीराम बोडके, सदस्य, अकोट, जि. अकोला

११) श्री. भगवान भाऊसाहेब जवळेकर, सदस्य, सांगली

**अहवालाचे स्वरुप:** सदर अहवाल एकूण ८९ पानांचा असून त्यात प्रस्तावना, सारांश, तात्त्विक विवेचन व शिफारसी अशी चार प्रकरणे आहेत. प्रस्तावनेमधे अहवाल का व कसा तयार झाला, समितीमधील सदस्य कोण याची ओळख करुन दिलेली आहे. सारांश या प्रकरणात सर्व शिफारसींचा थोडक्यात परिचय करुन दिलेला आहे, तर तात्त्विक विवेचन हा भाग सर्वात मोठा (पृष्ठ क्र. १२ ते ७५) असून त्यात रोहयोच्या आतापर्यंतच्या यशापयशाचे विश्लेषण, नव्याने सुचवलेल्या शिफारसींमागील युक्तिवाद व त्या शिफारशी अशी मांडणी सविस्तरपणे केलेली आहे. शिफारसी या प्रकरणात याच शिफारसी स्वतंत्रपणे मांडलेल्या आहेत. त्यांची एकूण संख्या ४० आहे.

**अहवालाची चिकित्सा करण्याची गरज:** समिती सदस्यांची वर दिलेली यादी पाहिल्यास हे उघड होते की अहवाल–लेखनाचे अंतिम काम हे मुख्यत: शासकीय अभियंते व प्रशासकीय अधिकारी यांनी केले आहे. समितीच्या अशासकीय सदस्यांना मात्र केवळ लेखी सूचना देऊन अहवालाची प्रत मिळण्याची वाट पहावी लागली आहे, किंबहुना पाठपुरावा केल्यावरच त्यांना ती मिळालेली आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात हा अहवाल चर्चेला आल्याची बातमीदेखील मर्यादित वर्तुळापर्यंतच पोचण्याची/पोचू दिला जाण्याची शक्यताच यातून ठळकपणे पुढे येते. अहवालाची वंचितांच्या दृष्टिकोनातून व व्यापक पातळीवर चर्चा/चिकित्सा होण्याची गरज अहवाल लेखनाबाबतच्या या वास्तवामुळे अधोरेखित होते.

## ब) अहवालातील शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर योजनेत असे बदल होतील..

अहवालात मांडलेल्या शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर रोहयोच्या उद्दिष्टापासून ते तिच्या कारभार व निधी–व्यवस्थापनापर्यंत सर्व बाबींमध्ये लक्षणीय बदल होतील. यातील काही बदल हे योजनेच्या मूलभूत गाभ्याशी सुसंगत असे असतील – त्यामुळे योजनेचे स्वरुप अथवा रोजगार हमीचा कायदा यामधे मूलभूत बदल होणार नाहीत. काही बदल मात्र मूलभूत स्वरुपाचे – योजनेच्या स्वरुपात व मूळ कायद्यात महत्त्वाचे फेरफार करणारे असतील. अर्थातच वंचित गटांसाठी अशा बदलांचे परिणामही दूरगामी असतील. शिफारसींची व्याप्ती नजरेसमोर यावी यासाठी वरील दोन्ही प्रकारचे बदल थोडक्यात मांडलेले आहेत :

### १. योजनेच्या उद्दिष्टातील बदल

* मूळ उद्दिष्ट – ग्रामीण क्षेत्रातील अकुशल प्रौढ व्यक्तींसाठी रोजगाराची हमी व त्यांच्या कायम रोजगारासाठी उत्पादक मत्तेची (ॲसेट)निर्मिती.
* नवे उद्दिष्ट – ग्रामीण कोरडवाहू शेतकरी व आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी कोरडवाहू क्षेत्रात पाणलोट क्षेत्र विकासाला प्रथम प्राधान्य.

### २. योजनेसंबंधी प्रशासकीय जबाबदारी आणि अधिकार

* सध्याच्या पद्धतीप्रमाणे योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शासनाच्या विविध विभाग–खात्यांऐवजी पूर्णतः जलसंधारण विभागाकडे दिली जाईल.
* 'जलसंधारण' हा बहुशाखीय विभाग होईल – कृषी खात्यातील पाणलोट विषयक आस्थापना जलसंधारण विभागाकडे वर्ग होईल.
* 'दुष्काळी कामे' व 'विकासाची कामे' अशा दोन प्रकारात योजनेअंतर्गत कामांची विभागणी
* दुष्काळी कामांतर्गत तात्कालिक रोजगार निर्मितीसाठी कंपार्टमेंट बंडिंग, रस्त्यांचे रुंदीकरण, सिंचन प्रकल्पांच्या कालव्यांची दुरुस्ती यासारखी दुष्काळी कामे व त्यांची तात्कालिक जबाबदारी व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे
* दुष्काळ वगळता इतर वर्षांत विकास–कामे व पाणलोटक्षेत्रविकासासाठी कामे यासाठी योजनेचा वापर, त्यामुळे योजनेची दीर्घकालीन जबाबदारी व अधिकार जलसंधारण खात्याकडे

## ३. योजनेची अंमलबजावणी

योजनेच्या अंमलबजावणीत 'काम कोण करणार', 'कशा प्रकारे, त्याचे मोजमाप व मजुरी कशी दिली जाणार' इ. विविध मुद्यांचा समावेश होतो. या सर्व मुद्यांबाबतचे बदल खालीलप्रमाणे असतील:

* मूळ कायद्यानुसार 'रोजगाराची हमी' ही 'जिल्हास्तरीय हमी' आहे. परंतु मजुरांच्या दुष्काळ–सापेक्ष उपलब्धतेमुळे ठराविक कालावधीत कामे पूर्ण करण्यासाठी स्थानिक मजूर उपलब्ध नसतील तर खालील दोन उपाय केले जातील. 'रोजगार निर्मितीला' प्राधान्य देण्यासाठी खालीलपैकी उपाय क्र.१ वर जास्त भर दिला जाईल:
  - उपाय क्र १: मजुरांची उपलब्धता जास्त असलेल्या भागातून (राज्याच्या कोणत्याही जिल्ह्यांतून) उपलब्ध नसलेल्या ठिकाणी मजुरांचे स्थलांतर (लँड आर्मी )
  - उपाय क्र २: कामाच्या आवश्यकतेनुसार, काम पूर्ण करण्याला प्राधान्य देऊन कंत्राटदार व यंत्रसामुग्रीचा वापर करणे.
* हजेरीपत्रकावर काम होणे शक्य नसेल अशा ठिकाणी 'बनावट' हजेरीपत्रकांना आळा घालण्यासाठी 'पीसवर्क' पद्धती; कंत्राटदारामार्फत स्थानिक मजुराला काम व किमान वेतनाएवढी मजुरी
* कामाची गुणवत्ता व काम पूर्ण होणे या दोन मुद्यांना महत्त्व देण्यासाठी 'कुशल : अकुशल' या प्रमाणात शास्त्रीय निकषा–नुसार बदल व कुशल कामांच्या प्रमाणात वाढ
* मजुरांनी केलेल्या कामाचे मोजमाप शासनाबाहेरील अभियांत्रिकी सेवेकडून
* कोकणातील लहान कॉन्क्रीट बंधाऱ्यांची कामे पूर्णपणे कुशल स्वरुपाची असल्याने अभियांत्रिकी यंत्रणेमार्फतच. त्याचप्रमाणे लाईन ट्रीटमेंटची कामेदेखील पूर्णपणे कुशल स्वरुपाची असल्याने जलसंधारण या अभियांत्रिकी विभागामार्फत, तर क्षेत्रीय उपचारांची तुलनेने कमी कुशल कामे कृषी खात्यातील कृषी अभियंत्यांकडूनच
* ज्या ठिकाणी हजेरीपत्रकावर काम केले जाते व करणे शक्य आहे तेथे धनादेशाद्वारे मजुरी देण्याचा प्रयत्न

## ४. योजनेचे मूल्यमापन व गुणवत्ता नियंत्रण

* गुणवत्ता नियंत्रणासाठी शासनाबाहेरील संस्था व निवृत्त अभियंत्यांची 'गुणवत्ता नियंत्रक' म्हणून नेमणूक व त्यांच्यामार्फत कामाच्या गुणवत्तेची तपासणी
* शासकीय अधिकारी–कर्मचारी–पाणलोटक्षेत्रातील शेतकरी आणि स्वयंसेवी संस्था यांच्यासाठी यशदा, मेरी, वाल्मी यासारख्या संस्थांमध्ये प्रशिक्षणाची तरतूद.
* रोहयोचे नियमित मूल्यमापन व त्यात विद्यापीठासारख्या बाहेरील व्यावसायिक संस्थांचा सहभाग.

## ५. रोहयो निधी -

रोहयो निधीचा वापर व त्याचे व्यवस्थापन यामधे देखील शिफारसी प्रत्यक्षात आल्यास बदल होतील. ते खालीलप्रमाणे:

### अ) <u>रोहयो निधीचा वापर</u> –

रोहयो निधीचा वापर वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या कार्यक्रमांबरोबरच खालील नवीन बाबींवरदेखील होईल:

* पाणलोटक्षेत्रविकासासाठी राज्याचा पाणलोट निहाय बृहत् आराखडा तयार करण्याचे काम (तांत्रिक बाबी व तांत्रिक मनुष्यबळाचा खर्च)
* सरकारी अधिकारी, कर्मचारी इ. च्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणाची जबाबदारी घेणाऱ्या यशदा, मेरी, वाल्मी या संस्थांना निधी
* तरुण–सुशिक्षित बेरोजगारांना कौशल्य प्रशिक्षण देणाऱ्या शासकीय कौशल्य–प्रशिक्षण संस्थांसाठी निधी

## ब) <u>निधीचे व्यवस्थापन</u>

* रोहयो निधीचा वापर इतर कारणांसाठी होऊ नये यासाठी स्वतंत्र लेखा (account) निर्मिती.

## ६. रोहयो अंतर्गत करण्याजोग्या कामांची व्याप्ती -

रोहयो अंतर्गत आतापर्यंत काढल्या जाणाऱ्या कामांची व्याप्ती खालील प्रमाणे वाढेल:

* कोरडवाहू क्षेत्रासाठी पाणलोट क्षेत्र विकासाची कामे
* नगरपालिकाक्षेत्रातील नवीन शहरी भागांमधे रस्ते–बांधणी व ग्रामीण तसेच नगरपालिकाक्षेत्रातील भूमिहीनांसाठी घरबांधणी
* फळबाग योजना तत्त्वावर वैयक्तिक लाभाच्या नवीन योजना–चारा लागवड, बायो डिझेल (जट्रोफा) व वनौषधी लागवड, सुशिक्षित तरुणांसाठी रोपवाटिका उद्योग स्वतंत्रपणे
* आदिवासी व भूमिहीनांसाठी शासकीय पडिक जमीन भाडे पद्धतीने देऊन त्यांचे भातशेतीत रुपांतर करण्यासाठी रोहयो
* ग्रामीण भागातील गरजू महिलांच्या संस्थांना सरकारी/सार्वजनिक जमिनीचा काही भाग नाममात्र भाडे–पट्टीवर उपलब्ध करुन त्या जमिनीवर फळबाग इ. स्वरुपाची उत्पादक योजना राबवण्याची तरतूद
* आदिवासी क्षेत्रात पडकई पद्धतीने भातशेतीची खाचरे करण्याची योजना
* विदर्भात पडकई तत्त्वावर व मोठ्या प्रमाणावर बोडी (तलाव) निर्मिती

**वरील मांडणीच्या आधारे खालील प्रश्नांची नेमकी चर्चा करण्यासाठी आवश्यक पार्श्वभूमी तयार व्हावी अशी अपेक्षा आहे:**

* शिफारसींमुळे वंचितांच्या हिताला प्राधान्य किती प्रमाणात मिळते आहे? अहवालातील कोणत्या शिफारसी वंचितगटांच्या हितासाठी प्रभावीपणे वापरता येतील?
* अभियांत्रिकी–नोकरशाही दृष्टिकोन आणि वंचिताभिमुख दृष्टिकोन यापैकी कशाला झुकते पारडे मिळाले आहे? अहवालाच्या सुरुवातीला नमूद केलेल्या योजनेच्या उद्दिष्टाशी शिफारसींचा आवाका किती सुसंगत आहे?
* योजनेचा कारभार खरोखर वंचिताभिमुख व्हावा यासाठी कोणत्या मुद्यांवरील भर कमी होणे/वाढणे अथवा बदलणे गरजेचे आहे?

या प्रश्नांबाबत सखोल विचारविनिमय करण्यासाठी अहवालातील शिफारसींची सविस्तर चर्चा करणे गरजेचे आहे. **भाग दोन** मध्ये हीच चर्चा केलेली आहे.

***************

# भाग २ : अहवालातील शिफारसींची सविस्तर चर्चा

टिपणाच्या या भागात एकूण तीन मुद्यांच्या आधारे अहवालातील शिफारसींची सविस्तर चर्चा केलेली आहे: अ)शिफारसींबाबत अहवालात केलेली मांडणी आणि वंचितांच्या दृष्टिकोनातून त्यावर उपस्थित होणारे प्रश्न–मुद्दे ब)अहवालात दुर्लक्षित राहिलेले मुद्दे क)अहवालाच्या एकूण परिणामाबाबत काही निरीक्षणे

## अ) शिफारसींबाबत अहवालात केलेली मांडणी आणि वंचितांच्या दृष्टिकोनातून त्यावर उपस्थित होणारे प्रश्न-मुद्दे

* **अहवालातील 'तात्त्विक चर्चा' या प्रकरणाची ओळख:** अहवालाचे, विशेषतः त्यातील 'तात्त्विक चर्चा' या विभागाचे, सलग वाचन करताना दिसून येते की अहवालात सुचवलेल्या या शिफारसींमागे योजनेच्या यशापयशाचे निश्चित असे विश्लेषण आहे. रोहयोवर गेल्या २५–३० वर्षांत भरपूर खर्च होऊनही त्यातून अपेक्षित परिणाम निष्पन्न झालेला नाही, योजना शून्यवत् होण्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाही, असे समितीने नमूद केले आहे. या अपयशाचे विश्लेषण करताना समितीने योजनेच्या अंमलबजावणीत राहून गेलेल्या १५ त्रुटी मांडलेल्या आहेत. योजनेच्या नियोजनात तसेच अंमलबजावणीत होणाऱ्या (रोजगार हमी वर काम करणारे मजूर, प्रशासकीय अधिकारी, अंमलबजावणी करणारी शासकीय व अशासकीय यंत्रणा अशा विविध पातळ्यांवरील) अडचणी असे या त्रुटींचे स्वरूप आहे. या त्रुटींचे नेमके स्वरूप काय आणि त्यावर काय उपाययोजना करणे गरजेचे आहे याची सविस्तर चर्चा एकूण ३९ मुद्यांमध्ये अनेक उपमुद्यांच्या सहाय्याने केलेली आहे, व या मुद्यांच्या अनुषंगाने शिफारसीही मांडलेल्या आहेत.
* **शिफारसींची सविस्तर चर्चा करण्याची गरज:** वंचितांसाठी या शिफारसींचे परिणाम (मुख्यतः संभाव्य धोके) काय असू शकतील याची चर्चा करण्यासाठी केवळ शिफारसींचा विचार करणे पुरेसे नाही, तर शिफारसींमागील विश्लेषण आणि त्या–त्या शिफारसीसाठीचे युक्तिवाद समजून घेणे गरजेचे आहे. हे विश्लेषण आणि त्यावर आधारित युक्तिवाद समजून घेतल्यास वंचितांसाठी अहवालातील शिफारसींचे संभाव्य परिणाम (फायदे तसेच धोके) काय असू शकतील याची नेमकी व संतुलित चर्चा करणे सोपे होईल. त्याचप्रमाणे शिफारसी अथवा शिफारसींसाठीचे युक्तिवाद याबाबत वंचितांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे उपस्थित करणेदेखील महत्त्वाचे आहे. वंचितविरोधी शिफारसींना कोणते पर्याय उभे करायचे याची स्पष्टता येण्यासाठी या प्रश्न–मुद्यांची मदत हाऊ शकेल.
* **शिफारसी त्यामागील युक्तिवाद, आणि त्यावरील टिप्पणी यांची मांडणी:** याच भूमिकेतून, गोषवाऱ्याच्या टिपणाच्या या भागात अहवालातील 'तात्त्विक विवेचन' या भागातील चर्चेचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. विश्लेषण आणि युक्तिवादांची अहवालात केलेली मांडणी विस्कळीत असल्याने आढावा घेताना त्यांची संगतवार पुनर्रचना केली आहे.त्याचप्रमाणे वंचितांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास शिफारसी तसेच त्यामागील युक्तिवादांबाबत उपस्थित होऊ शकणारे प्रश्न अथवा संभाव्य धोकेदेखील या आढाव्याच्या जोडीने मांडलेले आहेत. अहवालातील शिफारसी खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख करण्यासाठी, त्यासाठीचे नेमके व पर्यायी युक्तिवाद उभे करण्यासाठी टिपणातील या मांडणीचा उपयोग व्हावा असे वाटते. युक्तिवाद व शिफारसींबाबतचे एकूण १२ मुद्दे खाली मांडलेले आहेत. ही मांडणी खालीलप्रमाणे केलेली आहे:
  * योजनेच्या अपयश/त्रुटीबाबत अहवालात मांडलेला मुद्दा,
  * त्या मुद्यांचे विश्लेषण/युक्तिवाद,
  * त्यावरील शिफारस,
  * याबाबत वंचितांच्या दृष्टिकोनातून उठणारे प्रश्न/मुद्दे

१ ते ३ मुद्यांमधे अहवालाचा आढावा व क्र. ४ च्या मुद्यामधे या आढाव्यावर वंचितांच्या दृष्टिकोनातून टिप्पणी अशी मांडणी असल्याने १ ते ३ या मुद्यांसाठी एकसारखा फॉन्ट व क्र. ४ च्या मुद्यासाठी वेगळा फॉन्ट अशी मांडणी केलेली आहे.

# १) योजनेच्या उद्दिष्टामधील बदल

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– ***<u>रोहयो ही विकासाची योजना आहे, हा भाव रूजला नाही.</u>***

### विश्लेषण/युक्तिवाद

'मागणीप्रमाणे रोजगार पुरवणे' हे रोजगार हमीचे उद्दिष्ट असल्याने 'विकासाच्या' कामांना प्राधान्य मिळाले नाही. कोरडवाहू शेतीची परिस्थिती बिकट आहे त्यामुळे त्यावर अवलंबून असलेल्या ग्रामीण व आदिवासी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी पाणलोटक्षेत्रविकास हाच तरणोपाय आहे. याशिवाय आतापर्यंत हजारो कोटी रुपये पाणलोटक्षेत्रविकासाच्या कामावर खर्च झाले आहेत, त्यातील कित्येक कोटींची कामे अपूर्ण राहिलेली आहेत. म्हणून, 'मागणीप्रमाणे रोजगार पुरवित राहणे' या उद्दिष्टापुरती रोहयो मर्यादित होऊ नये. नियोजनबद्धपणे पाणलोटक्षेत्रविकास कार्यक्रम राबवणारी विकास योजना असे रोहयोचे स्वरूप असावे.

### शिफारस

'पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून कोरडवाहू शेतीचा विकास व त्याद्वारे कोरडवाहू शेतकरी आणि आदिवासी समाजाची आर्थिक उन्नती करून राज्याचा विकास करणे हे रोहयोचे यापुढील उद्दिष्ट असावे.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून संभाव्य धोके, प्रश्न/मुद्दे

* *पाणलोट क्षेत्रविकास हाच रोहयोचा मुख्य कार्यक्रम असल्यास, डोंगर कपारीत राहणारे आदिवासी, पाणलोट क्षेत्राबाहेर वस्ती करणारे–'गावकुसाबाहेरील समाजघटक' आणि भूमिहीन यांच्या आर्थिक उन्नतीला आवश्यक ते प्राधान्य मिळणार नाही.*
* *त्याचप्रमाणे पाणलोटक्षेत्रामधील वरच्या अंगाला जमिनी असणाऱ्या दुर्बल शेतकऱ्यांनाही रोहयोमुळे फायदा होणार नाही. पाणलोटक्षेत्र विकासाच्या कामांचा व योजनेचा मोठा फायदा खोऱ्यात सुपीक जमिनी असणाऱ्या बलिष्ठांना होईल.*
* *वंचितांसाठी 'मागणीप्रमाणे रोजगाराचा हक्क देणारी योजना' ही या योजनेची मोठीच ताकद आहे, योजनेच्या उद्दिष्टातील वरील बदलामुळे या ताकदीला मोठाच धक्का बसण्याची शक्यता ठळकपणे पुढे येते.*
* *वंचितांच्या दारिद्र्यनिर्मूलनासाठी रोहयोमध्ये पाणलोटक्षेत्रविकासाइतकेच किंवा त्यापेक्षा जास्त प्राधान्य कोणत्या मुद्यांना द्यायला हवे, असे आपण ठामपणे म्हणू शकतो?*

# २) योजनेची संपूर्ण 'मालकी' जलसंधारण खात्याकडे देण्याबाबत

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *<u>योजनेच्या प्रशासनातील विस्कळीतपणा</u>*

### विश्लेषण/युक्तिवाद

योजनेची अंमलबजावणी शासनाच्या विविध विभागांकडून होत असल्यामुळे कामे सुट्या–सुट्या विखुरलेल्या स्वरुपात होतात. बहुविभागीय प्रशासनामुळे पाणलोट विषयक कामांचे एकत्रिकरण व त्यांची नोंददेखील होत नाही. परिणामी पुढील

व्यवस्थापनासाठी ही कामे सोपवता येत नाहीत. त्यामुळे पाणलोट विषयक कामे केली जाऊनही त्यांचा परिणाम दिसत नाही. शिवाय अनेक विभागांनी मिळून अंमलबजावणी करण्याच्या पद्धतीमुळे अनावश्यक खर्च होतो. या कामांचे एकत्रीकरण हे कोणत्याच एका विभागाकडे होत नसल्यामुळे कामे पूर्ण होण्याची व त्यांच्या गुणवत्तेची जबाबदारीही कोणाकडेच राहत नाही.

मुख्य जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे असल्याने कोणत्याच विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हे काम आपले वाटत नाही, कनिष्ठ अधिकाऱ्यांना हे काम 'महसूल खात्याचे वाटते'. शिवाय योजनेतील कामांची तपासणी सध्या राजकीय लोक/लोकप्रतिनिधींकडून होते. या प्रकाराला तोंड देणे फार गुंतागुंतीचे ठरते. त्यामुळे देखील शासनाच्या इतर खात्यांची रोहयोची कामे करण्यास नाराजी असते. परिणामी रोहयोची अंमलबजावणी मुख्यतः नाईलाजापोटी केवळ कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून होते, वरिष्ठ अधिकारी त्यापासून अलिप्त राहतात. दुसरीकडे, जिल्हाधिकारी इतर असंख्य व्यवधानांमध्ये व्यस्त असल्याने रोहयोची जबाबदारी घेणे त्यांच्यासाठी जिकिरीचे होते. किंबहुना 'जिल्हाधिकारी' या सारख्या पदावरची व्यक्ती कितीही आदर्श असली तरी रोहयोसारख्या योजनेची जबाबदारी घेणे एका व्यक्तीसाठी अतिशय कठीण होते.

### शिफारस

हे सर्व मुद्दे लक्षात घेता रोहयोच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी एका स्वतंत्र विभागाकडे सोपवणे गरजेचे आहे. रोहयोचे काम हे मुख्यतः 'पाणलोट-क्षेत्र' विकासाचे असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या 'जलसंधारण' या विभागाकडे योजनेची संपूर्ण जबाबदारी सोपवावी. त्यासाठी नवीन पदे निर्माण करण्याची देखील गरज नाही. रस्ते/घरे बांधण्यासाठी आवश्यक ती आस्थापना जलसंधारण विभागाकडे नाही. त्यामुळे रस्ते व घर बांधणीच्या कामांची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम खात्याकडे सोपवावी.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून संभाव्य धोके, प्रश्न/मुद्दे

* ***योजनेचा कारभार एकाच खात्याच्या त्यातही जलसंधारणासारख्या अभियांत्रिकीला प्राधान्य देणाऱ्या खात्यांच्या हाती गेल्यास योजनेची लोकाभिमुखता कमी होऊ शकते. सध्याच्या व्यवस्थेत गाव, तालुका या पातळ्यांवरदेखील रोहयो समित्या व त्यांच्या माध्यमातून स्थानिकांच्या सहभागाची तरतूद आहे. ही सर्व व्यवस्था केंद्रीकरणामुळे नाहीशी/दुबळी होण्याची शक्यता आहे.***
* ***मूळ कायद्यानुसार कामाची जबाबदारी ही अंमलबजावणी करणाऱ्या खात्याकडे आहे व विविध खात्यातील जबाबदाऱ्यांचे सुसूत्रीकरण जिल्हाधिकाऱ्यांनी करायचे आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कल्पकपणे व कार्यक्षमतेने रोहयोचा उपयोग केल्याची उदाहरणे देखील ताजी आहेत. या पार्श्वभूमीवर एकाच खात्याकडे योजनेचा कारभार केंद्रित झाल्यास त्यामध्ये स्थानिक परिस्थितीला योग्य तो न्याय मिळणार नाही तसेच स्थानिक संस्थासंघटनांचा योजनेच्या कारभारावरील प्रभाव जवळ जवळ नाहीसा होईल अशा शक्यता आहेत.***

## ३) अपूर्ण कामांचा प्रश्न

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

**– रोहयोखाली सुरू झालेली सुमारे १,५०० कोटी किमतीची कामे वर्षानुवर्षे अपूर्ण राहिलेली आहेत.**

### विश्लेषण/युक्तिवाद

अपूर्ण कामांमध्ये सरकारी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात अडकलेली आहे. पाणलोटविषयक कामांवर खर्च होऊनही ही कामे केवळ अपूर्ण राहिल्यामुळे त्यांचा अपेक्षित फायदा झालेला नाही. कामे अशा रीतीने अपूर्ण राहण्याची दोन मुख्य कारणे आहेत: १) पुरेसे मजूर उपलब्ध न होणे २) सध्याच्या योजनेतील अशास्त्रीय निकषांवर आधारित नियम

**१) पुरेसे मजूर उपलब्ध न होणे:** रोजगार हमीची कामे ही मुख्यतः दुष्काळात काढली जातात. मजुरांची कामाची मागणीही प्रामुख्याने दुष्काळात असते. दुष्काळ ओसरला की मजुरांकडून होणारी कामाची मागणीही ओसरते, कारण त्यांची मानसिकता स्वतःच्या शेतीच्या कामांना प्राधान्य देण्याची असते. परिणामी, दुष्काळात सुरु केलेली कामे दुष्काळानंतर अपूर्ण राहतात आणि ती पूर्ण करण्यासाठी पुढच्या दुष्काळाची वाट पहावी लागते. दुष्काळ दर वर्षी पडत नाही. तर दर ५-६ वर्षांनी येतो असा राज्याचा मागील अनुभव आहे. त्यामुळे रोहयोची कामे वर्षानुवर्षे अपूर्ण राहतात.

**२) सध्याच्या योजनेतील अशास्त्रीय निकषांवर आधारित नियम:** अकुशल काम पूर्ण झाल्याशिवाय कुशल काम सुरू करू नये असा रोहयोचा सध्याचा नियम आहे. मजुरांच्या उपलब्धतेअभावी कामाचा अकुशल भाग पूर्ण होऊ शकत नाही. परिणामी, कामाचा कुशल भाग देखील सुरू होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सध्याचे ५१:४९ हे प्रमाण शास्त्रीय निकषावर आधारित नाही. कारण कुशल व अकुशल कामाचे प्रमाण भौगोलिक परिस्थितीनुसार बदलते. त्याचप्रमाणे रस्ते वा इतर अभियांत्रिकी कामात कुशल व अकुशल भाग एकमेकांशी जोडलेले असतात. अशास्त्रीय निकषांवर आधारित नियमांना चिकटून राहिल्यामुळे अकुशल कामांवर जरुरीपेक्षा जास्त खर्च होतो. 'नियमानुसार' काम दाखवण्यासाठी अकुशल कामाच्या खर्चाचे बनावट आकडे दाखवण्यात येतात. त्यामुळे कामे अपूर्ण राहणे, अवाजवी खर्च होणे आणि गैरव्यवहार असे तिहेरी नुकसान होते.

## शिफारस

कामे जास्तीत जास्त दोन वर्षांच्या कालावधीत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण व्हावीत. त्यासाठी नियमात आवश्यक ती शिथिलता यावी. मजुरांच्या उपलब्धतेसाठी स्थानिक मजूर उपलब्ध नसल्यास राज्याच्या ज्या भागात मजूर उपलब्ध असतील त्या भागातून मजूर आणून काम पूर्ण करावे. (या पद्धतीला लॅन्ड-आर्मी असे नाव देण्यात आले आहे.)

हे शक्य नसल्यास कंत्राटदार, यंत्रसामुग्री इ. चा वापर करून काम पूर्ण करावे. त्यासाठी 'कुशल-अकुशल' प्रमाणाचे बंधन असू नये. 'मजुरांना रोजगार पुरवणे' या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यासाठी लॅन्ड आर्मी या पर्यायाचा अग्रक्रमाने विचार करावा.

## वंचित गटांच्या दृष्टिकोनातून संभाव्य धोके, प्रश्न/मुद्दे

* कंत्राटदारांच्या वर्चस्वाला उघड मान्यता मिळून कंत्राटदारांकरवी होणाऱ्या भ्रष्टाचारावर कायद्याचेही नियंत्रण राहणार नाही.
* कंत्राटदार वा इतर हितसंबंधांमुळे स्थानिक मजुरांचा कामाचा हक्क डावलण्यात येईल.
* लॅन्ड आर्मीसारख्या पर्यायामुळे 'जिल्हास्तरीय' हमी संपुष्टात येईल व मजुरांचे पोटासाठी देशोधडीला लागणे कायद्याने संमत होईल. स्थलांतरित झाल्यामुळे आधीच वंचित असणाऱ्या गटांच्या वंचिततेमध्ये भर पडेल.
* कामे ठरावीक मुदतीत पूर्ण व्हावीत याचे नियोजन स्थानिक मजुरांची उपलब्धता लक्षात घेऊन त्याप्रमाणे कसे करता येईल?
* जेथे मजूर भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत तेथून ते हलविण्याऐवजी त्याच भागात वंचितांना हमखास कायमस्वरूपी रोजगार देतील अशा प्रकारची रोजगार हमीची कामे काढणे अधिक रास्त नाही का?
* स्थानिकांच्या सहभागाशिवायच केलेले जलसंधारणाचे किंवा 'पायाभूत सुविधा विकासाचे' कोणतेही काम खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकेल का?
* स्थानिक मजुरांच्या सहभागातून त्यांना उपयोगी पडणाऱ्या कामांचे नियोजन करणे व त्यातून कामासाठी मजुरांची उपलब्धता व सहभाग खात्रीशीरपणे मिळवणे हा खरा लोकाभिमुख उपाय नाही का?
* कोकण व विदर्भ प्रदेशाच्या काही भागात मजूर उपलब्ध होत नाहीत, असा वर्षानुवर्षाचा अनुभव असेल तर त्यामागील कारणे शोधून मगच उपाय सुचवणे महत्त्वाचे नाही का? या भागात रोहयोवर मजूर येत नाहीत याचा अर्थ तेथील स्थानिक वंचितांना-आदिवासी, भटके, दलित, एकट्या स्त्रिया-अशा गटांना देखील काम मिळण्याची गरज नाही असा होतो का?

* दुष्काळामुळे अन्नान्न दशा झालेली नाही अशा काळात मजूर कामावर येत नसतील तर कंत्राटदारांना यंत्राने काम करण्यासाठी रोहयोचे पैसे देण्याऐवजी तेथील मजुरांना (किमान वेतनापेक्षा) जास्त/आकर्षक मजुरीचे दर देणे हे वंचितांच्या दृष्टीने अधिक रास्त नाही का? मजुरी वाढल्यास शेतीच्या कामासाठी मजूर मिळणार नाहीत ही भीती कितपत खरी आहे? ती काही अंशाने खरी असली तरी देखील वंचितांना जास्त दर देऊन त्यांची स्थिती सुधारणे व त्यांची वाटाघाटीची ताकद वाढवणे हे रास्त ठरणार नाही का?
* कुशल–अकुशल प्रमाण शास्त्रीय निकषांवर आधारित हवे हे खरेच, पण सध्याचे कुशल–अकुशल प्रमाण ठरवताना काय निकष लावले गेले होते, याची चर्चा करणेही महत्त्वाचे नाही काय?
* 'अकुशल' भागाला झुकते माप देण्याचे समर्थन 'ज्यांच्याकडे कोणतेच कौशल्य नाही, केवळ श्रम आहेत, अशांना काम करण्याचा हक्क प्राधान्याने मिळावा' अशा प्रकारे करता येऊ शकते. लॅन्ड आर्मी अथवा कॉन्ट्रॅक्टर यंत्रसामुग्री वापरण्याच्या पर्यायात अशा अकुशल वंचित गटांना काय स्थान असेल? त्यांना पोटा–पाण्याचा प्रश्न सन्मानाने सोडवता यावा याची हमी कोण घेईल?

## ४) कंत्राटदाराची आवश्यकता

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

**– एका गावातून/जिल्ह्यातून दुसरीकडे स्थलांतर करण्यास मजूर तयार नसतात, त्यामुळे रोहयो कामांसाठी पुरेसे मजूर उपलब्ध होत नाहीत.**

### विश्लेषण/युक्तिवाद

अपूर्ण कामे ठरावीक कालावधीतच व्हावीत यासाठी लॅन्ड आर्मीचा पर्याय प्रत्यक्षात येण्यात मजुरांच्या मानसिकतेमुळे अडचणी येऊ शकतात. मजुरांचा कल दिवसभर काम करून संध्याकाळी घरी परत येण्याकडे असतो. त्यामुळेच रोजगार हमी योजनेंतर्गत गावापासून लांब काम दिल्यास निवासाच्या सर्व सुविधा पुरविण्यात येत असल्या तरीही गावापासून लांब, जिल्ह्याबाहेर जाण्याची मजुरांची तयारी नसते. मात्र, मराठवाड्यातून तसेच इतरत्र बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मजूर नियमितपणे स्थलांतरित होतात. हे कसे होते याचा शोध घेतल्यास दिसते की 'मुकादम' हा मधला माणूस असल्यामुळे मजूर या स्थलांतराला तयार होतात. सध्याच्या रोजगार हमी योजनेत मजुराने केलेल्या कामाचा पैसा थेटपणे मजुरालाच मिळावा, मधल्या माणसाला मिळू नये, या उद्देशाने सरकारी खात्यांनी मजुरांकडून थेटपणे काम करून घेण्याची, मजुरी देण्याची पद्धत रुळविण्यात आली. एरवी आपत्कालीन कामे सोडल्यास इतर कोणत्याही कामांसाठी मजुरांशी थेटपणे व्यवहार करण्याची पद्धत सरकारी खात्यांमध्ये रूळलेली नाही. त्यामुळे रोजगार हमीमध्ये मजुरांशी थेटपणे व्यवहार करणे प्रशासकीय यंत्रणेला गैरसोयीचे वाटते. शिवाय मजुरांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी मधल्या माणसाचे अस्तित्व अपरिहार्य आहे असे दिसते. सध्याच्या योजनेनुसार मात्र कंत्राटदाराकरवी मजुरांनी काम केले की ते 'कुशल' काम समजण्यात येते.

### शिफारस

पुरेशा प्रमाणात मजूर उपलब्ध होण्यासाठी कंत्राटदाराकरवी केलेले काम 'कुशल' काम समजण्यात येऊ नये. कंत्राटदाराकडे मजुरांना किमान वेतनाइतकी मजुरी मिळेल याची काळजी घ्यावी.

पुढचा मुद्दादेखील वरील मुद्याशी निगडीत असल्याने या मुद्यासाठीची व पुढच्या मुद्यासाठीची टिप्पणी प्रत्येक मुद्यानंतर न देता एकत्रितपणे दिलेली आहे.

## ५) बनावट हजेरीचा प्रश्न व कंत्राटदारीला मान्यता देण्याची गरज आणि अपरिहार्यता

### योजनेच्या अपयश/त्रुटीबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *रोहयो कामांसाठी हजेरीपत्रक ठेवणे सक्तीचे असले तरी खोटी/बनावट हजेरी लावण्याचा प्रकार सर्रासपणे घडतो.*

### विश्लेषण/युक्तिवाद

रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना बनावट हजेरीपत्रके ठेवण्याचा व उपस्थित नसलेल्या मजुरांची तसेच वृद्ध व लहान मुलांची खोटी हजेरी लावण्याचा प्रकार सर्रास दिसतो. प्रत्यक्षात मात्र कंत्राटदाराकरवी होणाऱ्या कामाचे दुसरे हजेरीपत्रक मजुरीचा हिशेब करण्यासाठी दाखवले जाते. सरकारी अधिकाऱ्यांसाठी 'नियमानुसार' बनावट मस्टर (हजेरी पत्रक) ठेवले जाते. कंत्राटदाराकरवीच रोजगार हमीची कामे होतात हे वास्तव आहे. त्यामुळे त्यावर बंधन आणण्याऐवजी कंत्राटदारांना उघड मान्यता दिली तर खोट्या हजेरीपत्रकांच्या पद्धतीला आपोआप आळा बसेल. बनावट हजेरी पत्रक ठेवण्यासारखा गैरव्यवहार शासकीय योजनेच्या कारभारात रूळणे योग्य नाही. कंत्राटदारांना पीसवर्क पद्धतीने काम नेमून दिल्यास कामाला शिस्त येते, काम वेळेत पूर्ण होते, कामाच्या दर्जासाठी कंत्राटदाराला जबाबदार धरता येते, शिवाय मजुरांना योग्य मजुरी मिळेल हे पण पाहता येते.

### शिफारस

बनावट हजेरीपत्रकाच्या पद्धतीतून रोहयोची सुटका करण्यासाठी तसेच कामे ठरावीक वेळेत पूर्ण करण्यासाठी पीसवर्क पद्धतीने कंत्राटदारांना रोहयोचे काम दिले जावे. कंत्राटदारांकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी पुढील दोन बंधने पाळणे सक्तीचे करावे: १) स्थानिक मजुरांनाच काम देण्यास प्राधान्य द्यावे. २) मजुरांना दिली जाणारी मजुरी किमान वेतनाएवढी असावी.

जिथे हजेरीपत्रक ठेवले जाते व ठेवणे शक्य आहे तिथे मजुरी धनादेशाद्वारे देण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे हजेरी मजुरांच्या खात्यात जमा होऊन मजुरीबाबत होणाऱ्या भ्रष्टाचारावर बंधन येईल.

### ४ व ५ साठी वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* ***धनादेशाद्वारे मजुरी देण्याची शिफारस स्वागतार्ह वाटली तरीही ती व्यवहार्य कशी करता येईल याची कोणतीही चर्चा अहवालात केलेली नाही. बँकांची उपलब्धता व मजुरांसाठी सोयीस्करपणा, बँक अधिकारी व रोहयो यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था यासारख्या आवश्यक बाबींचा उल्लेखदेखील अहवालात केलेला नाही. त्याचप्रमाणे धनादेश पती व पत्नी दोघांच्याही नावे काढणे यासारख्या प्रागतिक बाबींचा विचारही केलेला नाही. त्यामुळे ही तरतूद केवळ कागदावर राहण्याचा धोका असू शकतो.***
* ***बनावट हजेरी पत्रकांना आळा घालण्यासाठी कंत्राटदारांना मान्यता दिल्यास त्यांच्याकरवी होणाऱ्या भ्रष्टाचारालाही हिरवा कंदील मिळेल. रोहयोची कामे कंत्राटदारांकरवी का होतात याचे उघड उत्तर 'कंत्राटदार व इतर स्थानिक हितसंबंधियांच्या आर्थिक लाभासाठी' असे आहे, हे लक्षात न घेता मजुरांच्या मानसिकतेचे अतार्किक कारण दिले गेले आहे असे दिसते. मजूर कंत्राटदाराकरवीच स्थलांतर का करतात याचे उत्तर मजुरांच्या कंत्राटदारांवर विसंबण्याच्या मानसिकतेत नसून कंत्राटदार मजुरांची नड व निकड ओळखून त्यांना आगाऊ रोख रक्कम देतात आणि बांधील करून घेतात या वस्तुस्थितीत आहे. त्यामुळे ज्यांना विशिष्ट काळात तातडीने आर्थिक आधार मिळण्याची गरज असते अशा वंचितांच्या गटांचा विचार रोहयोत कसा करता येईल, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे अहवालाचे दुर्लक्ष झालेले दिसते.***

* *कंत्राटदाराकरवी केवळ कुशल काम, अकुशल कामाला पर्यायाने अकुशल, गरीब मजुरांना प्राधान्य, स्थानिक मजुरांकरवीच काम या सर्व रोहयोतील वैशिष्ट्यपूर्ण तरतुदी खरे तर वंचितांसाठी संरक्षक तरतुदी आहेत. या तरतुदी काढून टाकल्यास, तसेच त्यांच्या जागी कोणत्याही नवीन (व व्यवहार्य) तरतुदी न आणल्यास 'समाजाच्या शेवटच्या घटकासाठीची योजना' हे योजनेचे स्वरूप नाहीसे होऊन प्रामुख्याने 'कंत्राटदारांसाठी, कंत्राटदारांची योजना' असे विपरीत स्वरूप योजनेला येऊ शकते. हे लक्षात घेता, मजुरांची अपुरी उपलब्धता, अंमलबजावणीतील भ्रष्टाचार आणि कामे ठरावीक कालावधीत पूर्ण न होणे हे प्रश्न हाताळण्याचे वंचिताभिमुख मार्ग कोणते असू शकतील?*
* *हे मार्ग व्यवहार्य कसे करता येतील? ते प्रत्यक्षात येण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला काय करावे लागेल?*

# ६) कामांच्या गुणवत्तेचा प्रश्न

## योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

*– बिगर अभियंता यंत्रणेकडून पाणलोटविषयक कुशल कामे राबविली गेल्यामुळे कामांची गुणवत्ता खालावते.*

## विश्लेषण/युक्तिवाद

रोहयोंतर्गत करावयाची कामे ही प्राधान्याने पाणलोट क्षेत्र विकासाची कामे आहेत. ही कामे, विशेषतः लाईन ट्रीटमेंटची (बंधारे, चर खोदणे) कामे अभियांत्रिकी कौशल्यावर आधारित आहेत तर क्षेत्रीय उपचारांची कामे (एरिया ट्रीटमेंट) ही तुलनेने कमी कुशल कामे आहेत. लाईन ट्रीटमेंटची कामे संपूर्णपणे कुशल असल्याने ती अभियांत्रिकी तत्त्वावर व जलसंधारण या अभियांत्रिकी विभागाकडूनच होणे आवश्यक आहे. क्षेत्रीय उपचारांची कामे (नाला बंडिंग, सीसीटी, डीसीटी इ.) सध्याच्या व्यवस्थेत कृषी विभागाकडून राबविली जातात. कृषी विभागाकडे कृषी अभियंत्यांची कमतरता असल्यामुळे कृषी पदवीधारकांकडून ही कामे राबवली जातात. त्यामुळे कामांमध्ये गुणवत्तेचा अभाव दिसून येतो.

सध्याच्या व्यवस्थेत कामाची तपासणीदेखील बिगर–अभियंता असलेल्या शासकीय अधिकाऱ्यांकडून केली जाते. इतर प्रशासकीय कामांचा बोजा, रोहयो कामे दुर्गम ठिकाणी असणे, एकाच वेळी अनेक ठिकाणी कामे चालू असणे अशा विविध अडचणींमुळे तपासणी करणे शासकीय अधिकाऱ्यांना शक्य होत नाही. परिणामी, कामांच्या गुणवत्तेवर नियंत्रण राहत नाही. केंद्रसरकारच्या प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेत गुणवत्ता नियंत्रणासाठी शासनाबाहेरील तज्ञ व्यक्ती क्वलिटी मॉनिटर्स म्हणून नेमल्या जातात. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा रस्ते इ. कार्यक्रमांपेक्षा अधिक महत्त्वाचा कार्यक्रम असल्याने रोहयोसाठी देखील याच धर्तीवर क्वालिटी मॉनिटर्स नेमले जावेत.

## शिफारसी

* लाईन ट्रीटमेंटची कामे ही संपूर्णपणे जलसंधारण विभागाकडे सोपवावीत. तर एरिया ट्रीटमेंटच्या कामांसाठी कृषीखात्यातील अभियंता–आस्थापना जलसंधारण खात्यात वर्ग करावी.
* जलसंधारणाच्या कामांचा बृहत् आराखडा तयार करण्याचे काम जलसंधारण खात्याकडे सोपवावे, त्यासाठी आधुनिक तंत्रे वापरावीत व रोहयो निधीतून त्यासाठीची तरतूद करावी.
* दगडी बंधाऱ्यांची कामे टिकाऊ नसल्याने फ्लाय अॅश व कॉँक्रीट वापरून (त्यामुळे पर्यावरण संवर्धक) बंधाऱ्यांची कामे केली जावीत. कोकणात अशा बंधाऱ्याची मालिका तयार केली जावी. ही कामे संपूर्ण कुशल स्वरूपाची असल्यामुळे जलसंधारण विभागाकडूनच व्हावीत.
* शासनाबाहेरील तज्ज्ञ व निवृत्त अभियंत्यांची कामांच्या गुणवत्ता तपासणीसाठी नेमणूक करावी. अशा तटस्थ तपासणीमुळे कामांचा दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकेल.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून संभाव्य धोके, प्रश्न/मुद्दे

* *कामांचा दर्जा राखण्यासाठी कुशल कामे अभियांत्रिकी तत्त्वावर होणे निश्चितच महत्त्वाचे आहे. परंतु नियोजन, अंमलबजावणी व नियमन म्हणजेच योजनेचा संपूर्ण कारभार अभियांत्रिकी यंत्रणेच्या हातात गेल्यास योजनेचा विचार केवळ तांत्रिक अंगाने होऊन त्यातील सामाजिक, प्रशासकीय व राजकीय अंगांचा विचार न होण्याचा धोका आहे.*
* *केवळ आधुनिक तांत्रिक कौशल्याला प्राधान्य दिल्यास स्थानिक पारंपारिक शहाणपण व कौशल्य डावलले जाण्याची शक्यता आहे. कामाच्या गुणवत्तेला प्राधान्य व स्थानिक कौशल्ये यांची सांगड घालण्याचा विचार अहवालात केलेला दिसत नाही. खर्चीक तंत्रज्ञानाऐवजी समुचित–टिकाऊ तंत्रज्ञानाच्या लोकाभिमुख पर्यायाचा विचार देखील केलेला नाही.*
* *अभियांत्रिकी यंत्रणेकडे संपूर्ण कारभार सोपवल्यास वंचित गटांचा सहभाग केवळ प्रासंगिक श्रम करण्यापुरता उरेल आणि सध्याच्या योजनेत असलेल्या प्रभावी लोकसहभागासाठीच्या तरतुदी निष्प्रभ होतील.*
* *वंचितांची बाजू मांडणाऱ्या, त्यांच्याबरोबर काम व संघर्ष करणाऱ्या व्यक्ती व गटांना या सर्व प्रक्रियेत काहीही स्थान उरणार नसल्याने यंत्रणेच्या कारभारावर राज्यपातळीवरील राजकीय पुढाऱ्यांखेरीज कोणाचाच अंकुश/नियंत्रण राहणार नाही.*
* *कामांचा दर्जा टिकवणे, त्याच वेळी त्याची गती राखणे आणि हे करताना लोकसहभाग व स्थानिक कौशल्यांची जोड देणे या सर्वांची सांगड गुणवत्ता वाढीसाठी कशी घालता येईल?*
* *अमानुष मानवी श्रम टाळण्यासाठी तसेच कामातील तांत्रिक कौशल्य आणि श्रमाधारित रोजगार निर्मितीसाठी मनुष्यबळाचा योग्य वापर या दोन्हींमधे समन्वय कसा साधता येईल?*
* *तांत्रिक बाबींच्या गुणवत्ता नियंत्रणाबरोबरच योजनेच्या सामाजिक, प्रशासकीय व राजकीय अंगांचे नियमन/ नियंत्रण कसे करता येईल?*

## ७) शहरात रोहयोचा विस्तार करण्याची शिफारस

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *निमशहरी भागात रहाणारी पण मूळची ग्रामीण असणारी कुटुंबे रस्ते, निवास अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहतात.*

### विश्लेषण/युक्तिवाद

निमशहरी तसेच नगरपालिकेच्या क्षेत्रातील रस्ते व भूमिहीनांसाठी घरे बांधण्याची शिफारस समितीने मांडलेली आहे. म्हणजेच रोहयोचा विस्तार केवळ ग्रामीण भागापुरता मर्यादित न ठेवता शहरी भागात वाढवण्याचा प्रस्ताव आहे. शहरात नव्याने झालेल्या वस्त्यांमधील जनताही मुख्यतः ग्रामीण जनताच असते. नगरपालिकांना परवडत नसल्यामुळे या वस्त्यांमधील रस्ते कधीच बांधले जात नाहीत. त्यामुळे या वस्त्यांमधून रस्ते बांधण्याची तरतूद रोहयो निधीतून केली जावी. त्यासाठी कुशल–अकुशल प्रमाणाचे बंधन घालू नये.

### शिफारस

ग्रामीण व नगरपालिका क्षेत्रातील भूमिहीनांसाठी याच प्रकारच्या युक्तिवादाद्वारे घरे बांधण्याची शिफारस समितीने केलेली आहे.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* *शहरातील गरीबांसाठी रस्त्यासारखी पायाभूत सुविधा, निवाऱ्यासारखी मूलभूत सुविधा निर्माण होणे निश्चितच महत्त्वाचे आहे. परंतु रोहयोचा निधी हा मुख्यतः ग्रामीण भागासाठी असणे अपेक्षित आहे. नगरपालिका अथवा शहरातील प्रशासकीय यंत्रणेने शहरी–निमशहरी गरीबांसाठी अधिक कार्यक्षम होणे हा दीर्घकालीन उपाय असू शकतो याचा विचार वा चर्चा अहवालात दिसत नाही.*
* *ग्रामीण भागातील रस्ते व भूमिहीनांसाठी घरबांधणीचे काम निश्चितच महत्त्वाचे आहे. परंतु रोहयोचा अशा कामांबाबतचा (रस्ते इ.) आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता यापुढेही उत्पादक कामांऐवजी याच प्रकारच्या कामांवर अवाजवी भर दिला जाण्याची शक्यता आहे. या मुद्याकडे अहवालात लक्ष दिलेले दिसत नाही. त्याचप्रमाणे आधीचा अनुभव लक्षात घेता, अशा कामांची गुणवत्ता कशी राखता येईल याची चर्चा अहवालात केलेली नाही.*

## ८) सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार निर्मितीची गरज

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *<u>अशिक्षित बेरोजगारांप्रमाणेच सुशिक्षित बेरोजगारांची संख्या गेल्या काही वर्षात वाढत चाललेली आहे.</u>*

### विश्लेषण/युक्तिवाद

वरील पायाभूत सुविधांप्रमाणेच सुशिक्षित बेरोजगारांसाठी कौशल्य प्रशिक्षणातून रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होतात. अशा तरुणांच्या प्रशिक्षणाचा भार रोहयोने उचलण्यास काहीच हरकत नसावी. प्रशिक्षणाच्या संदर्भात शहरी–ग्रामीण असा भेद असू नये असे समितीने सुचवलेले आहे.

विविध तांत्रिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिल्यास या सुशिक्षित बेरोजगारांना पाणलोटविषयक कामांच्या अंमलबजावणीचे काम देखील देता येईल.

### शिफारस

सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या प्रशिक्षणाची तरतूद विविध शासकीय प्रशिक्षणसंस्थांमध्ये रोहयो निधीतून व्हावी असे सुचविले आहे.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* *सुशिक्षित बेरोजगारांसाठी कौशल्य–प्रशिक्षणातून रोजगार संधी निर्माण करणे महत्त्वाचे असले तरी रोजगार हमी ही मुख्यतः ग्रामीण आणि अकुशल वर्गासाठीची योजना आहे हे लक्षात घेऊन या अकुशल वर्गातील अशिक्षित बेरोजगारांचे कौशल्य प्रशिक्षण करुन त्यांच्यासाठीच्या रोजगारसंधी कशा वाढवता येतील?*
* *त्याचप्रमाणे शहरी भागातील बेरोजगार वर्गासाठी शहरी विकास निधीतून रोजगार निर्मितीचे प्रयत्न कसे वाढवता येतील?*

## ९) ग्रामीण भागातून शहरात होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *<u>ग्रामीण भागातून स्थलांतरितांचे लोंढे शहरांमध्ये रोजगारासाठी येत राहतात.</u>*

## विश्लेषण/युक्तिवाद

ग्रामीण भागातून शहरात होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न सोडवण्यासाठी उत्पादक रोजगार निर्मितीची गरज आहे. त्यासाठी १) जलसंधारण २) मृद्संधारण व ३) फलोत्पादन योजनेच्या धर्तीवरील कार्यक्रम, असे तीन उपाय सुचवलेले आहेत. यातील मृद्संधारण व फलोत्पादन योजनेच्या धर्तीवरील कार्यक्रम हे मुख्यतः आदिवासी, अल्पभूधारक व भूमिहीन समाजासाठी सुचवलेले आहेत. वैयक्तिक व सामुदायिक लाभाच्या योजना असे त्यांचे स्वरुप आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी, अल्पभूधारक समाजाला जलसंधारणाचा पुरेसा फायदा होत नाही, त्यावर मर्यादा येतात हे लक्षात घेऊन या शिफारसी सुचवण्यात आलेल्या आहेत.

आदिवासी समाज, ग्रामीण स्त्रिया ह्या मुळातच कष्टाळू असून त्यांच्या हाती उत्पादक साधन आल्यास त्यांची आर्थिक उन्नती होऊ शकेल असा विश्वास समितीने वरील कार्यक्रमांची शिफारस करताना व्यक्त केलेला आहे.

याच विचाराने, परंतु स्थानिक भौगोलिक वैशिष्ट्यांचा संदर्भ लक्षात घेऊन समितीने काही कार्यक्रमांची शिफारस केलेली आहे.

## शिफारस

* चारा लागवड, दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी रोहयो, याची जबाबदारी शासन एका वर्षासाठीच घेईल.
* औषधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी रोहयो
* फळबाग योजनेत द्राक्ष पिकाचा समावेश. शिवाय, फळबाग रोपवाटिका तयार करण्याचे व वितरित करण्याचे काम शासनाच्या कृषी विभागाऐवजी खाजगी तत्त्वावर–सुशिक्षित तरुण कृषी उद्योजकांकडे
* भूमिहीनांना शेतीसाठी भाडेतत्त्वावर शासकीय जमीन
* दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या गटांना सरकारी/पडीक जमिनी सामुदायिक शेतीसाठी (फळबाग तत्त्वावरील योजना राबवणे अपेक्षित.)
* तीव्र डोंगरउतारावर सामुदायिक पद्धतीने केली जाणारी भातशेती 'पडकई' या नावाने ओळखली जाते. हा कार्यक्रम (तीव्र डोंगरउतारावर भातखाचर तयार करण्याचा) कोकणात मोठ्या प्रमाणावर राबवावा.
* विदर्भात बोडी (म्हणजे तलाव) करण्याचा पारंपरिक कार्यक्रम रोहयोतून मोठ्या प्रमाणात राबवण्यात यावा.

## वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* ***या सर्व शिफारसींमधील केवळ दोन शिफारसी (भूमिहीन व दारिद्र्यरेषेखालील महिलांच्या हाती उत्पादक साधन) थेटपणे व प्राधान्याने वंचितांनाच उपयोगी पडणाऱ्या आहेत. तर इतर शिफारसींचा उपयोग प्रामुख्याने वंचितेतर गटांनाच होण्याची शक्यता आहे.***
* ***चारा लागवड, औषधी वनस्पती यासारख्या नव्या कार्यक्रमाचा उपयोग वंचितगटातील मोठ्या प्रमाणातील अशिक्षित व अकुशल मजुरांना होणार नाही. मात्र त्यामुळे त्यांच्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होईल का?***
* ***फळबाग नर्सरी व रोपवितरण खाजगी तत्त्वावर करण्याचे धोके वंचित गटांसाठी काय असू शकतील? या तरतुदीचा फायदा वंचितांना व्हावा यासाठी काय उपाय करता व सुचवता येतील?***
* ***वैयक्तिक लाभार्थींसाठी असणाऱ्या योजनांचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता या शिफारसी केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात याव्यात यासाठी काय तरतुदी नव्याने सुचवता येतील?***
* ***या शिफारसींचा फायदा प्रस्थापितांना प्रामुख्याने न होता वंचित गटांना प्रामुख्याने व्हावा यासाठी कोणते बदल सुचवता येतील?***

## १०) लोकसहभागाअभावी जलसंधारण कामे अयशस्वी होण्याचा प्रश्न

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग घेतला गेला नाही.*

### विश्लेषण/युक्तिवाद

जलसंधारणाची आतापर्यंत झालेली कामे लोकसहभागाअभावी अयशस्वी झाल्याचे समितीने आतापर्यंतच्या अंमलबजावणीतील त्रुटींमधे नमूद केलेले आहे. जलसंधारणाच्या नियोजनात व व्यवस्थापनात लोकसहभाग सरसकटपणे घेता येईल का याचा विचार करणे गरजेचे आहे. लोकांचा सहभाग नियोजनात असावा. कोणती कामे कोणत्या प्राधान्याने निवडायची याचे अधिकार लोकप्रतिनिधींना मिळावेत. कामाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्थानिक प्रशासनाकडे सोपवावी, त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरही त्यांची नोंद करावी. त्यामुळे झालेल्या कामांची नासधूस करावयास कोणी धजावणार नाही. रोहयो म्हणजे कसे तरी करुन करायचे काम हा विचार बदलणे गरजेचे आहे. त्यातूनच काम न करता फक्त मजुरी मिळावी अशी अपेक्षा करण्याच्या मजुरांच्या प्रवृत्तीला आळा बसेल.

### शिफारस

जलसंधारणाच्या कामांचे व्यवस्थापन ग्रामपंचायतींकडे सोपवावे व ग्रामपंचायतींना पाणीपट्टी आकारण्याचे अधिकार द्यावेत, ७/१२ वर या कामांची नोंद व्हावी.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* *लोकसहननिभागासाठीच्या शिफारसी केवळ कागदावर रहाण्याचा किंबहुना त्याची सूत्रे लोकाभिमुख नसलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती जाण्याची शक्यता ठळकपणे पुढे येते. या शक्यतेच्या संदर्भात खालील प्रश्नांचा विचार व्हावा असे वाटते.*
* *लोकप्रतिनिधींना कामे निवडण्याचा अधिकार दिल्याने स्थानिक वंचितांच्या (ज्यांचा लोकप्रतिनिधींवर प्रभाव नाही अशा) गरजांना प्राधान्य मिळू शकेल का?*
* *लोकप्रतिनिधींच्या पातळीवरील 'प्रस्थापिताभिमुख' राजकारणावर वंचितांचा अंकुश आणणे कसे शक्य होईल?*
* *व्यवस्थापनातील सहभागाशिवाय, कामांच्या नियोजनात लोकसहभाग मिळावा व त्यातून 'जलसंधारणाची कामे' ही शासनाऐवजी 'लोकांची कामे' व्हावीत, यासाठी कोणते ठोस पर्याय आपण सुचवू शकतो?*

## ११) योजना विकासाभिमुख बनवण्याची गरज

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

– *रोहयो ही योजना विकासाची योजना हा भाव जनतेत तसेच शासकीय अधिकाऱ्यांमध्ये रुजला नाही. दुर्गम आदिवासी भागात रोहयोची माहिति पोचत नाही.*

### विश्लेषण/युक्तिवाद

* जनतेचा रोहयोबाबतचा दृष्टिकोन विकासाभिमुख होण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राशिवाय इतर राज्यांचादेखील रोहयो राबवण्याचा विचार आहे. यादृष्टीने रोहयोवर होणारा खर्च, त्याचा परिणाम इत्यादी माहिती जनतेपर्यंत पोचणे

महत्त्वाचे आहे. आदिवासी भागातील (उदा. नंदुरबार, गडचिरोली) जनतेला रोहयोची माहिती सोप्या शब्दात उपलब्ध होणे गरजेचे आहे.

* योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांचा योजनेकडे बघण्याचा दृष्टिकोन विकासाभिमुख होणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना पाणलोट क्षेत्र विकासाची माहिती होणे आवश्यक आहे. पाणलोट क्षेत्र विकास हा कोरडवाहू जमिनीला न्याय देणारा कार्यक्रम आहे. योजना यशस्वी झाल्यास ग्रामीण गरीबांचे जीवनमान उंचावणार आहे, या विचाराने रोहयोची अंमलबजावणी करणारे अधिकारी व कर्मचारी भारीत व्हायला हवेत. अशाच अधिकारी व कर्मचाऱ्यांची योजनेसाठी निवड करणे शक्य आहे.
* योजना विकासाभिमुख होण्यासाठी योजनेचे मूल्यमापन नियमितपणे बाहेरील व्यावसायिकांकडून होणे गरजेचे आहे.

### शिफारसी

* रोहयोबाबत सोप्या भाषेत माहिती देणारे साहित्य नियमितपणे तयार व वितरित केले जावे.
* योजनेचा वार्षिक अहवाल दरवर्षी जाहीर केला जावा.
* योजनेचे मूल्यमापन नियमितपणे व विद्यापीठासारख्या शासनाबाहेरील व्यावसायिक संस्थांकडून व्हावे.

### वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे

* ***योजनेत पारदर्शकता आणण्याचे प्रयत्न निश्चितच गरजेचे आहेत, परंतु वरील शिफारसी या विशिष्ट गटापुरत्याच मर्यादित राहण्याची शक्यतादेखील नाकारता येत नाही.***
* ***योजनेच्या कारभाराची माहिती योजनेत श्रम करणाऱ्या कष्टकऱ्यांपर्यंत, तसेच त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था-संघटना व कार्यकर्त्यांपर्यंत कशी पोचेल?***
* ***योजनेच्या मूल्यमापनात विशेषज्ञांबरोबरच रोहयो-मजुरांच्या अनुभवांचा व मतांचा प्राधान्याने समावेश व्हावा यासाठी कोणते उपाय सुचवता येतील?***
* ***रोहयो अंतिमतः कष्टकरी जनतेला उत्तरदायी व्हावी यासाठी कोणते ठोस उपाय सुचवता येतील?***

## १२) रोहयो निधीच्या व्यवस्थापनाचा प्रश्न

### योजनेच्या अपयश/त्रुटींबाबत अहवालात मांडलेला मुद्दा

**- रोहयोचा निधी रोहयोतर कामांसाठी वापरला जातो.**

### विश्लेषण/युक्तिवाद

रोहयो कामांसाठी निधीची कमतरता नाही व ती उद्भवणारही नाही. हा निधी शासनाकडे शिल्लक आहे. सध्याच्या व्यवस्थेत हा निधी शासनाच्या एकत्रित निधीमधे जमा होतो. सध्याच्या आर्थिक दृष्ट्या नाजूक काळात हा निधी राज्याकडून इतर कामासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे रोहयोची कुशल कामे पूर्ण करण्यासाठी निधीची तूट पडते. हे टाळण्यासाठी या निधीचा वापर रोहयो व्यतिरिक्त इतर कामांवर न करण्यासाठी कायदेशीर व्यवस्था होणे गरजेचे आहे.

### शिफारस

* रोहयो निधीसाठी स्वतंत्र लेखा (account) करावा.

**वंचित गटांच्या दृष्टिकोनातून प्रश्न/मुद्दे**

- ** ही शिफारस निश्चितच महत्त्वाची आहे. परंतु ती प्रत्यक्षात येण्यात कोणत्या अडचणी येऊ शकतील?*
- ** या आधी उल्लेख केल्याप्रमाणे शासकीय अधिकारी–कर्मचारी यांच्या प्रशिक्षणासाठी तसेच बेरोजगार तरुणांच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी देखील रोहयो निधीतून तरतूद होणार आहे. हा निधी यशदा, मेरी, वाल्मी तसेच इतर शासकीय प्रशिक्षण संस्थांना दिला जाणार आहे. या संदर्भात खालील प्रश्न उपस्थित करणे गरजेचे वाटते:*

  *अ) रोहयो निधीचे रोहयो यंत्रणेबाहेरील संस्थांमधे होणारे वितरण रोहयोसाठीच वापरले जाईल यासाठी कोणत्या संरक्षक तरतुदी (सेफगार्डस्) असाव्या लागतील? या संस्था कोणाला उत्तरदायी असतील?*

  *ब) प्रशिक्षणाच्या कामात स्वयंसेवी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग व्हावा यासाठी काय पर्याय सुचवता येतील?*

## ब) अहवालात दुर्लक्षित राहिलेले मुद्दे

अहवालात रोहयोच्या आतापर्यंतच्या अंमलबजावणीच्या यशापयशाचा आढावा घेतलेला आहे. त्यातून पुढे आलेल्या बहुतेक त्रुटींवर शिफारसीही सुचवलेल्या आहेत. परंतु खालील त्रुटींचा उल्लेख करुनही अहवालामधे त्यावरील शिफारसी मात्र सुचवलेल्या दिसत नाहीत.

१) योजनेमधे होणारा राजकीय हितसंबंधांचा हस्तक्षेप

२) योजनेच्या अंमलबजावणीत होणारा भ्रष्टाचार

३) लोकसहभागाचा अभाव

वास्तविक पाहता रोहयो वंचिताभिमुख होण्याच्या दृष्टीने हे सर्व मुद्दे अतिशय महत्त्वाचे आहेत. अहवालात या त्रुटींवर ठोस सूचना असणे अपेक्षित होते, परंतु त्यांचा केवळ उल्लेख केलेला आहे. म्हणूनच, या तीन मुद्यांवर आपण कोणत्या ठोस शिफारसी सुचवू शकतो? अशा शिफारसी सुचवणे आणि त्या अहवालात समाविष्ट व्हाव्यात यासाठी आग्रह धरणे महत्त्वाचे आहे असे या मुद्यांचा विचार करताना जाणवते.

## क) अहवालाचा एकूण परिणाम : काही निरीक्षणे

अहवालातील शिफारसींचा तसेच विश्लेषण/युक्तिवादांचा वंचितांच्या दृष्टिकोनातून विचार केल्यानंतर या शिफारसींचा एकूण परिणाम काय होईल याबाबत काही ठळक निरीक्षणे नोंदवणे गरजेचे वाटते. अहवालातील शिफारसींचे विषयवार वर्गीकरण केल्यास खालील चित्र दिसते:

**१. पाणलोट – अभियांत्रिकी कंत्राटदारी व गुणवत्ता नियंत्रण विषयक शिफारसी = एकूण २१**

- * पाणलोटविषयक – १६, त्यापैकी ८ अभियांत्रिकी तपशीलांसंबंधी; ३ प्रशासकीय संरचनेविषयी; ३ कंत्राटदारीला मान्यता देणाऱ्या; २ पाणलोटक्षेत्रविकासाचे उद्दिष्ट व व्याप्ती विषयक. (८+३+३+२)
- * अभियांत्रिकी तपशील विषयक ९ – पाणलोटविषयक शिफारसींमधील ८ व इतर शिफारसींमधील १ (८+१)
- * कंत्राटदारीला मान्यता देणाऱ्या ४ – पाणलोटविषयक शिफारसींमधील ३ व इतर शिफारसींमधील १
- * तांत्रिक गुणवत्ता नियंत्रण विषयक – ३

**२. योजनेतून प्रामुख्याने वंचितेतर गटांना होणाऱ्या लाभविषयक तरतुदींशी (लाभार्थी, लाभाचे स्वरुप, त्याची मर्यादा) संबंधित शिफारसी = एकूण ९**

- * सर्वसाधारण जमीनधारकांसाठी – ८ * शहरी भागात रस्ते विषयक – १

**३. योजना लोकाभिमुख बनवण्यासाठीच्या शिफारसी (एकूण ५)**

* कंत्राटदारीतून होणाऱ्या भ्रष्टाचारावर नियंत्रणविषयक - १
* मजुरी देताना होणाऱ्या भ्रष्टाचारावर नियंत्रणविषयक - १
* रोहयो निधीचा रोहयोतर कारणांसाठी वापर टाळण्याविषयी - १
* योजना पारदर्शक व्हावी यासाठी - १
* योजनेचा प्रसार व्हावा यासाठी - १

**४. शहरी व ग्रामीण भूमिहीनांसाठी अनुत्पादक परंतु कायमस्वरुपी मालमत्ता (घर) निर्माण व्हावी यासाठीच्या शिफारसी - १**

**५. वंचितांना कायमस्वरूपी उत्पादक साधन मिळावे यासाठीच्या शिफारसी - ३**

(आदिवासी व दारिद्र्यरेषेखालील बेरोजगार महिला व इतर भूमिहीनांसाठी उत्पादक साधननिर्मिती विषयक)

**या वर्गीकरणाच्या आधारे अहवालाच्या एकूण आशयाबाबत खालील निरीक्षणे मांडता येतील:**

१. 'पाणलोट क्षेत्र विकास' हे रोहयोचे उद्दिष्ट व्हावे यावर अहवालाचा मुख्य भर आहे.

२. रोहयोची मालकी जलसंधारण विभागाकडे असावी हा अहवालातील दुसरा प्रमुख मुद्दा आहे.

('रोहयोची मालकी जलसंधारण विभागाकडे असावी' असे विधान अहवालातील पृष्ठ क्र. ३१ वर आहे, हे या संदर्भात आवर्जून नमूद करावेसे वाटते.)

३. अकुशल मजुरांचा 'अडसर' दूर व्हावा यासाठी यंत्रसामुग्रीला (आणि त्याद्वारे यंत्रसामुग्री पुरवणारे कंत्राटदार, त्यांना परवाना देऊन फायदा मिळवणारे शासकीय अधिकारी या सर्वांना) खुला परवाना मिळावा, हा अहवालातील तिसरा प्रमुख मुद्दा आहे.

४. कामांचा दर्जा व गती वाढवण्याच्या मिषाने कंत्राटदारीला परवाना मिळावा हा अहवालातील चौथा महत्त्वाचा मुद्दा आहे.

अहवालातील इतर शिफारसी प्रत्यक्षात आल्या न आल्या तरी वरील ४ मुद्यांबाबतच्या शिफारसी निश्चितपणेच प्रत्यक्षात येतील हे उघड आहे, कारण अहवालाचा प्रमुख भर याच चार मुद्यांवर आहे. या वंचितविरोधी मुद्यांना कोणते पर्याय कसे उभे करता येतील याची चर्चा करणे व व्यूहनीती आखणे निश्चितच महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर अहवालातील तांत्रिक व नोकरशाहीच्या अंगाने केलेल्या विश्लेषणाच्या पलिकडे जाऊन रोहयो खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या मुद्द्यांचा समावेश अहवालात कसा होईल व हे मुद्दे प्रत्यक्षात कसे येतील यावर सखोल विचारविनिमय करणे नितांत गरजेचे आहे.

**भाग तीन** मधे असेच काही मुद्दे विचारासाठी मांडलेले आहेत.

***************

## भाग ३ : अहवालात विचारच न झालले प्रश्न

रोहयोचा उपयोग प्राधान्याने वंचित गटांना व्हावा या भूमिकेतून योजनेच्या यशापयशासाठी महत्त्वाचे ठरू शकतील असे काही मुद्दे समोर येतात. अहवालात या मुद्यांचा विचारच झालेला नाही किंवा झाला असल्यास तो अत्यल्प आहे असे दिसते. अशा मुद्यांचा समावेश अहवालात कसा करता येईल यावर विचारविनिमय होणे गरजेचे आहे. या भूमिकेतून रोहयोचा आशय व कारभार वंचिताभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असे काही प्रश्न चर्चेसाठी खाली सुचविले आहेत:

* शासनाने नेमलेल्या समितीच्या शिफारसी प्रत्यक्षात आल्या तर रोहयोच्या कायद्यामध्येच मूलगामी बदल होतील. कायद्यामध्ये असे धोरणात्मक बदल घडवण्याच्या प्रक्रियेत वंचित गटांना/त्यांच्यासोबत काम करणाऱ्या संघटना–संस्थांना स्थान मिळावे यासाठी काय उपाय/पर्याय सुचवता येतील?
* स्थानिक पातळीवर रोहयोच्या कारभारात स्वयंसेवी संस्था संघटनांना निर्णायक स्थान मिळावे यासाठी काय बदल सुचवता येतील?कोणती रणनीती आखता येईल?
* स्थानिकांना आपल्या गावात 'कोणती कामे करावीत' हे ठरवण्याचा व ते प्रत्यक्षात आणण्याचा अधिकार असावा यासाठी कोणता आग्रह धरणे व्यवहार्य ठरेल? रोहयोअंतर्गत मजुरांना 'काम मागण्याचा' हक्क असला, तरी तो 'निवडण्याचा' हक्क नाही, ही मर्यादा कशी दूर करता येईल?
* वंचित गटांना 'रोजगार हमी' त्यांची योजना वाटावी यासाठी योजनेअंतर्गत मिळणारी मजुरी, ती मिळण्याची पद्धत, काम सुरू होण्याचा कालावधी यासारख्या कळीच्या प्रश्नांबाबत कोणत्या तरतुदी नव्याने सुचवाव्या लागतील? सध्याच्या कायद्यातील तरतुदी प्रभावीपणे वापरल्या जाव्यात यासाठी कोणत्या उपायांचा आग्रह धरावा लागेल?
* भूमिहीनांना तातडीने तसेच दीर्घ काळासाठी उपजीविकेची (केवळ मजुरीची नव्हे) हमी मिळावी यासाठी अहवालात सुचवलेल्या भाडेतत्त्वावरील शेतीसारख्या पर्यायाच्या जोडीने इतर कोणते पर्याय सुचवता येतील?
* रोजगार हमी योजनेचा उपयोग वंचित गटांना तात्पुरती नव्हे तर दीर्घकालीन, तसेच फक्त मजुरीची नव्हे तर 'उपजीविकेची' हमी मिळण्यासाठी होऊ शकतो, असा स्वयंसेवी क्षेत्रातील अनुभव आहे. या अनुभवाच्या आधारे रोहयोत कोणत्या तरतुदी/बदल नव्याने सुचवता येतील? त्यासाठी स्वयंसेवी क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे कोणत्या गोष्टींचा आग्रह धरता येईल?

अहवालातील शिफारसी या प्रामुख्याने अभियांत्रिकी व नोकरशाहीच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या आहेत, हे लक्षात घेऊन अहवालात न मांडलेले परंतु योजना खऱ्या अर्थाने वंचिताभिमुख बनवण्यासाठी महत्त्वाचे ठरु शकतील असे काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न वरील प्रश्नांच्या मदतीने केला आहे. तुमच्या अनुभवातून अशाच काही मुद्यांची भर जरुर घालावी.

**********

# पुनर्विलोकन समितीच्या अहवालातील शिफारसी

१. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमातून भूजलाची पातळी वाढवून विहिरींच्या माध्यमातून हंगामी सिंचनाची सोय करून कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यांना दोन पिके घेण्याची सोय निर्माण करणे आणि त्याद्वारे या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या शेतकरी व आदिवासी समाजाची आर्थिक उन्नती करून राज्याचा विकास करणे हे यापुढ रोहयोचे उद्दिष्ट ठेवावे.

२. पाणलोट क्षेत्र विकासाची जबाबदारी एकाच विभागाकडे तात्काळ सोपवावी. हा विभाग हा राज्याचा जलसंधारण विभाग असावा. रोहयो कार्यक्रम हा जलसंधारण विभागाचा कार्यक्रम करावा. सध्याची रोहयोची कामे राज्याच्या वेगवेगळ्या विभागामार्फत करून घेण्याची पद्धत बंद करावी. रोहयो म्हणजे पाणलोट क्षेत्र विकास हे तत्त्व अंगिकारावे.

३. राज्यातील सर्व पाणलोट क्षेत्राचा एक बृहत् आराखडा तातडीने तयार करावा. अशा आराखड्यात वेगवेगळ्या विभागाकडून वेगवेगळ्या निधी स्रोतातून पाणलोट क्षेत्र विकासाची जी कामे झालेली आहेत आणि त्यांची आतापावेतो सध्याची स्थिती कशी आहे याचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून नोंद करावी. उर्वरित उपचाराची कामे नियोजनबद्ध पद्धतीने रोजगार हमी योजनेचा निधी वापरून पूर्ण करावीत.

४. जलसंधारण विभागाने असा बृहत् आराखडा तयार करण्यासाठी रोजगार हमी योजनेचा निधी उपलब्ध करून द्यावा. यासाठी अधिकचे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. या कामासाठी गरज पडल्यास या क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी व शासकीय संस्थांना पण पाचारण करून हे काम अचूकपणे पूर्ण करून घ्यावे. अशा सर्व पाणलोट क्षेत्र निहाय आराखड्याशिवाय पाणलोट क्षेत्र विकासाचे काम करू नये.

५. ज्या भागात रोजगार हमी योजनेसाठी स्थानिक मजूर उपलब्ध होत नाहीत, त्या ठिकाणी पाणलोट क्षेत्र विकासाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने ठरावीक कालावधीत पूर्ण करण्यासाठी खालील दोन पर्यायांचा विचार करावा.

(अ) मजुरांची उपलब्धता जास्त असलेल्या राज्याच्या भागातून, ज्या भागात मजुरांची कमतरता आहे त्या ठिकाणी मजूर वर्ग (land army) स्थलांतरित करण्याचा प्रयत्न करावा.

(ब) पाणलोट क्षेत्र हा प्रकल्प समजून पर्यायी (कंत्राटदार नेमून, यंत्र सामग्री वापरून) पद्धतीने विकासासाठीच्या उपचाराची कामे पूर्ण करून घ्यावीत.

मजुराला काम देण्याच्या दृष्टीने पर्याय १ चा विचार प्रथम करावा. ते शक्य नसल्यास पर्याय क्र.२ प्रमाणे कार्यवाही करावी. पण कोणत्याही परिस्थितीत मजुरांच्या उपलब्धतेसाठी दुष्काळाची वाट पाहत कामे अर्धवट ठेवू नये.

६. रोजगार हमी योजना दोन भागामध्ये राबवावी.

(१) रोजगार हमी योजना – विकासासाठी; (२) रोजगार हमी योजना – दुष्काळासाठी

दुष्काळी कालावधीत मजुराला काम देणे ही प्राधान्यक्रमता असल्यामुळे गरज भासल्यास समन्वय अधिकारी म्हणून संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे (सध्याच्या पद्धतीप्रमाणे) ही जबाबदारी सोपवावी. अशा परिस्थितीत मजुराला काम देण्याच्या दृष्टीने (शेतावर बांध घालणे, (compartment bunding) शेततळ्याची कामे करणे, रस्त्याचे रुंदीकरण करणे, कालवे–तलावाचे नूतनीकरण इ.) तुलनेने कमी अभियांत्रिकी कौशल्याची गरज असणारी कामे (relief measures) म्हणून करून घ्यावीत. सर्वसामान्य वर्षात मात्र रोहयो ही एक विकासाची योजना म्हणून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा एक प्रकल्प समजून जलसंधारण विभागामार्फत नियोजनबद्ध पद्धतीने राबवावी.

७. कंत्राटदाराकरवी मजुराचे exploitation होऊ नये म्हणून खालील अटींचे पालन करून घ्यावे.
(अ) मजूर प्रणित काम मजुरांमार्फत करून घ्यावे. (ब) स्थानिक मजुरांना प्रथमतः काम द्यावे.
(क) मजुराला दिली जाणारी मजुरी ही किमान वेतनापेक्षा कमी राहणार नाही यावर लक्ष ठेवावे.

८. पाणलोट क्षेत्र विकासाचे काम शास्त्रीय पद्धतीने व अभियांत्रिकी तत्त्वाला धरून करावे, या कामामध्ये अभियांत्रिकतेशी व गुणवत्तेशी तडजोड करू नये.

९. एका गावाला किमान एक रस्ता याप्रमाणे रस्ता करण्याचे काम पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम म्हणून राबवावा. रस्त्याचे आयुष्य वाढण्यासाठी व देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी करण्यासाठी रस्त्यावर रोहयोतून डांबरीकरणाचा नाममात्र (Single Coat Sur-face Dressing) थर देण्यात यावा.

१०. फळबाग योजनेसाठी एका कुटुंबाला मंजूर करावयाच्या क्षेत्राची मर्यादा कमी करावी व संख्येने जास्त शेतकऱ्याला या योजनेत सामील करून घ्यावे. ही मर्यादा राज्याच्या सर्व भागासाठी एका कुटुंबाला दोन हेक्टरपर्यंत असावी. ह्या योजनेत द्राक्ष पिकाचा पण समावेश करावा. ह्या योजनेसाठी लागणारी रोपे व कलमे होतकरू, विश्वसनीय तरूण शेतकऱ्याच्या रोप वाटिकेतून घेण्यास वाव द्यावा.

११. फळबाग योजना, जवाहर विहीर/मजगी/भात शेती, शेततळी इ. वैयक्तिक लाभाच्या योजनेपैकी एकाच योजनेचा लाभ एका शेतकऱ्याला द्यावा. मात्र यासाठी आदिवासी कुटुंबाचा अपवाद करावा.

१२. अशा वैयक्तिक लाभाची आर्थिक मर्यादा सद्यःपरिस्थितीत सर्वसाधारणतः रु. ५० हजारापर्यंत मर्यादित करावी. दर पाच वर्षांनी याचा आढावा घ्यावा.

१३. रोहयोतून हंगामी सिंचनाची सोय होत असल्यामुळे या पुढे कमी कालावधीची व कमी पाणी लागणारी पिकेच घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे.

१४. रोहयोचे नियमितपणे मूल्यमापन करावे. यासाठी विद्यापीठ व इतर नामवंत (Professional) संघटनांचा प्राथम्याने विचार करावा.

१५. रोहयोच्या कामात गुणवत्ता व यशस्विता आणण्यासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात नियमितपणे राबवावेत. प्रशिक्षणाची जबाबदारी यशदा, वाल्मी व मेरी सारख्या संस्थांना द्यावी. यासाठी या संस्थांना रोहयो निधी उपलब्ध करून द्यावा. असे प्रशिक्षण शासनातील अधिकारी, कर्मचारी व पाणलोट क्षेत्रातील शेतकरी, सेवाभावी संस्था यांच्यासाठी असावे.

१६. रोहयोच्या निधीतून शासनाच्या वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून गरजू, सुशिक्षित व बेरोजगार तरूणांना/तरुणींना प्रशिक्षित करून त्यांच्या कौशल्यामध्ये सुधारणा करावी यासाठी रोहयोचा निधी वापरावा.

१७. रोहयोतून दुग्ध विकास करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची (लसूण, घास, अंजन, हादगा इ.) चाऱ्यांची पिके घ्यावीत. अशाप्रकारच्या बियांची उत्पादन केंद्रे व रोप वाटिका सुरू कराव्यात व त्यातून शेतकऱ्यांना चाऱ्याचे बीज व रोपे उपलब्ध करून द्यावे व त्यांच्या खाजगी क्षेत्रावर सकस चारा वाढविण्यास प्रोत्साहित करावे. गवत हे बहुवार्षिक पीक नसल्यामुळे या पिकाची शेतकऱ्याला गोडी लागण्यासाठी व यातून तो अर्थार्जन करून पुढे येण्यासाठी फक्त एक वर्षाच्याच लागवडीच्या खर्चाची जबाबदारी रोहयोतून घ्यावी.

१८. Bio-Diesel निर्मितीस चालना देण्यासाठी फळबाग योजनेच्या धर्तीवर जट्रोफा वनस्पतीची लागवड हाती घ्यावी.

१९. फळबाग योजनेच्या धर्तीवर वनौषधीचा लागवडीचा कार्यक्रम राबवावा.

२०. सर्व प्रकारच्या वैयक्तिक लाभधारक योजना या फळबाग योजनेच्या धर्तीवरच राबवाव्या.

२१. गुंतविलेल्या निधीचा परतावा जलदगतीने मिळविण्यासाठी अपूर्ण कामे शक्य असेल त्या पद्धतीने हाती घेऊन येत्या २ वर्षांत पूर्ण करावीत. हा सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळावा.

२२. रोहयोचा वार्षिक अहवाल हा जनतेसाठी नियमितपणे प्रसिद्ध करून वितरित करावा.

२३. रोहयोअंतर्गत विविध कामांची सुलभपणे माहिती देणारी पुस्तिका काढून त्या मोठ्या प्रमाणात सतत वाटत राहाव्यात. अशा पुस्तिकांचे दरवर्षी नूतनीकरण करावे.

२४. त्या–त्या भागांशी अनुकूल आणि अभियांत्रिकी शास्त्राला धरून वेगवेगळ्या पर्यायांचा अभ्यास करून पाणलोट क्षेत्र विकासाच्या ज्या उपचारांचे बांधकाम करणे गरजेचे आहे त्याच उपचाराचे काम हाती घ्यावे. असे करत असताना कुशल–अकुशल या प्रमाणाचे बंधन घालू नये.

२५. कोकणासारख्या भागात रोहयोतून लहान–लहान काँक्रीट बंधाऱ्यांची मालिका निर्माण करावी. हे काम पूर्णपणे कुशल स्वरूपाचे असल्याने अभियांत्रिकी यंत्रणेमार्फतच करून घ्यावे.

२६. यापुढे सिमेंट बंधारे दगडी बांधकामात करू नयेत. यासाठी काँक्रिटचाच वापर करावा. Fly ash concrete चा पण अशा बंधाऱ्यासाठी विचार करावा.

२७. शहराभोवतीच्या नवीन वसाहतीत रोहयोतून रस्ते तयार करावेत. यासाठी ग्रामीण व शहरी असा भेदभाव करू नये.

२८. कमीत कमी खर्चात पण टिकाऊ स्वरूपाची किमान २५ चौ.मी. चटई क्षेत्र असलेली घरे रोहयोच्या निधीतून राज्यातील गरीब भूमिहीन व निवासहीन वर्गासाठी बांधावीत व त्याला कुशल–अकुशल प्रमाणाचे बंधन घालू नये. ही सोय नगरपालिकेपर्यंतच मर्यादित करावी. महानगरपालिकेच्या क्षेत्राचा विचार यासाठी करू नये.

२९. रोहयो निधीचा वापर इतर कामासाठी करण्यावर बंधने आणण्यासाठी या निधीचा शासनाने स्वतंत्र लेखा काढावा.

३०. ज्या ठिकाणी हजेरी पत्रकावर काम करणे शक्य आहे व केले जाऊ शकते, त्या ठिकाणी मजुराला मजुरी धनादेशाने देण्याचा पण विचार करावा.

३१. मजुराला वेळेवर मजुरी मिळण्यासाठी त्याने केलेल्या कामाचे मोजमाप घेण्यासाठी शासनाबाहेरील अभियांत्रिकी सेवेचा अवलंब करण्याचा विचार करावा.

३२. आदिवासी लोकांना आदिवासी क्षेत्रात कायमचे उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी भात शेतीची खाचरे निर्माण करून द्यावी. तर विदर्भाच्या गडचिरोली भागात बोडी/तलाव निर्माण करावेत. यासाठी पडकई पद्धतीचा अवलंब करावा.

३३. भूमिहीन शेत मजुरांना शासकीय पडीक, उताराची जमीन भाडे पद्धतीने देऊन त्याचे रूपांतरण भात शेतीत करावे.

३४. केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनेचे Over Lapping टाळण्यासाठी वेगवेगळ्या योजनेसाठी वेगवेगळे पाणलोट क्षेत्र निवडावेत.

३५. ग्रामीण भागात गरजू महिलांच्या संस्था निर्माण करून त्यांना सार्वजनिक/सरकारी जमिनीचा काही भाग नाममात्र भाडेपट्टीवर उपलब्ध करून देऊन त्यासाठी फळबाग योजनेसारखी योजना राबवून महिलांना कायम उत्पन्नाचे साधन निर्माण करून द्यावे.

३६. ज्या ठिकाणी हजेरीपत्रकावर काम करणे शक्य नसते त्या ठिकाणी सरळ (Piece Work) पद्धतीने कंत्राटदाराकरवी स्थानिक मजुराला काम देऊन त्याला किमान वेतनाएवढी मजुरी मिळेल याची काळजी घेऊन पाणलोट क्षेत्राच्या विकासाचे काम करावे आणि बनावट हजेरी पत्रक बनविण्याच्या पद्धतीतून रोहयोची सुटका करावी.

३७. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामात अभियांत्रिकी कौशल्य व गुणवत्ता आणण्यासाठी यापुढे (Drainage Line Treatment) ची कामे राज्याच्या जलसंधारण (लघुपाटबंधारे) या अभियांत्रिकी विभागामार्फतच करावीत. Area Treatment ची तुलनेने अभियांत्रिकी कौशल्य कमी असणारी कामे कृषी खात्यातील कृषी अभियंत्यांकडूनच करून घ्यावीत.

३८. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामात गुणवत्ता आणण्यासाठी शासनाबाहेरील संस्थांना व निवृत्त अभियंत्यांना PMGSY च्या तत्त्वावर Quality Monitors म्हणून नेमणूक करून कामातील गुणवत्तेची सातत्याने तपासणी करावी.

३९. पाणलोट क्षेत्र विकासाची कामे व्यवस्थापन, देखभाल दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, पंचायत समित्या इ.) हस्तांतरित करावे. गाव निहाय नकाशावर अशा उपचाराची नोंद घ्यावी. असे नकाशे ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावेत. या कार्यक्रमातून निर्माण झालेल्या सिंचन क्षेत्रावर पाणी पट्टी लावण्याचे अधिकार संबंधित ग्रामपंचायतींना कायद्याने द्यावेत.

४०. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा राज्यात सर्वत्र जलसंधारण विभागामार्फत राबवावा. हा विभाग बहुशाखीय करावा. कृषी विभागाकडील तालुका स्तरावरची पाणलोट क्षेत्र विकास कामाशी निगडित, आवश्यक तेवढीच आस्थापना जलसंधारण विभागाकडे वर्ग करावी.

**********

## प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी यावा यासाठी 'संसाधने व उपजीविका' गट काम करीत आहे. या गटातर्फे खालील विषयांवर काम चालू आहे.

**१) शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाच्या मांडणीचे काम :** 'शाश्वत उपजीविका' यावरील आंतरराष्ट्रीय चर्चेचा अभ्यास आणि या चर्चेत सहभागी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा पहिला टप्पा होता. अभ्यासक व कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव यांच्या मदतीने पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे व त्या दृष्टिकोनाचा विविध प्रकारे प्रसार करणे यावर सध्या काम चालू आहे.

**२) इतर अभ्यासात्मक उपक्रम :**

अ) विकासाचे उपजीविकाकेंद्री पर्यायी कार्यक्रम विकसित करताना त्या प्रक्रियांवर वंचितांचे नियंत्रण असले पाहिजे. असे नियंत्रण मिळवण्यासाठी माहितीसंकलनापासून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीपर्यंतच्या साऱ्या टप्प्यात वंचितांना खराखुरा सहभाग घेता यावा यासाठी खास साधने (tools) व पद्धती विकसित करण्यावर या गटाचे काम चालू आहे. वाडीचा/पाड्याचा/गावाचा उपजीविका जाहीरनामा तयार करण्यासाठीची साधने सध्या विकसित केली जात आहेत.

ब) 'रोजगार हमी योजना' या महाराष्ट्र राज्याच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेचे विश्लेषण करुन ही योजना वंचित घटकांच्या उपजीविका सुरक्षित करण्यासाठी साहाय्यभूत ठरावी यासाठी धोरणवकिलीचे (ॲडव्होकसी) प्रयत्न करणे, हा या गटाच्या कामाचा एक उद्देश आहे. याकरता या योजनेच्या आशयात आणि कारभाराच्या प्रक्रियेत (गव्हर्नन्स) काय सुधारणा करता येतील यावर कार्यकर्ते आणि अभ्यासक यांच्या मदतीने काम सुरू आहे.

**३) कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती :** पर्यायी विकासाच्या कार्यक्रमामध्ये पर्यायी शेतीच्या तंत्रात्मक अंगाची घडण करण्याच्या दृष्टीने हा गट काम करीत आहे. समाजातील वंचित समूहांच्या शाश्वत उपजीविकेसाठी रोख पैसे व बाह्य साधनाची गरज कमी असणाऱ्या कसणुकीच्या पद्धती व तंत्रे (विशेषत: नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासंबंधी) प्रयोगाद्वारे सिद्ध करून त्याचा प्रसार करणे असे या कामाचे स्वरुप आहे. या कामामध्ये प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण व माहिती संकलन असा चार–सूत्री कार्यक्रम चालू आहे.

*खाजगी वितरणासाठी*

## प्रयासविषयी

प्रयास हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने 'आरोग्य', 'ऊर्जा', 'शिक्षण व पालकत्व' तसेच 'संसाधने व उपजीविका' ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्‌मयनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

---

प्रयास

**संसाधने व उपजीविका गट :** 'मंगेशपुष्प', सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफच्याजवळ, वारजे, पुणे – ४११०५२.☎ २५२३२८३६, मोबाईल : ९४२२३१७५३०, फॅक्स – २५४२०३३७ E-mail: reli@vsnl.net Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :** अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे–४११००४. ☎ २५४४१२३०, २५४२०३३७.